सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, १८ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २९४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# राष्ट्रपतींच्या हस्ते मनू भाकर, डी गुकेश यांना खेलरत्न पुरस्कार प्रदान



नवी दिल्ली , १७ जानेवारी : राष्ट्रपती भवनात शुक्रवारी (१७ जानेवारी) राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार सोहळा पार पडला.या सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नेमबाज मनू भाकर आणि बुद्धिबळ चॅम्पियन डी गुकेश यांना ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार २०२४ ने सन्मानित केले. मनू-गुकेश यांच्या व्यतिरिक्त भारतीय पुरुष हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि पॅरा-थलीट प्रवीण कुमार यांनाही क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल समान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याशिवाय राष्ट्रपती मुर्मू यांनी अर्जुन पुरस्कार (आजीवन), राष्ट्रीय क्रीडा प्रोत्साहन पुरस्कार, द्रोणाचार्य पुरस्कार (नियमित आणि लाइटटाइम श्रेणी) आणि मौलाना अबुल कलाम आझाद (च-घ-) ट्रॉफी विजेत्यांनाही सन्मानित केले. अर्जुन पुरस्कार (आजीवन) प्राप्तकर्त्यांमध्ये भारताचा पहिला पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेता मुरलीकांत पेटकर यांचा समावेश आहे, ज्यांनी १९७२ पॅरालिम्पिकमध्ये ५० मीटर फ्रीस्टाइल जलतरणात पदक जिंकले होते. २२ वर्षीय मनू भाकरने गेल्या वर्षी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल आणि १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते. एकाच ऑलिम्पिकमध्ये दोन पदके जिंकणारी ती स्वतंत्र भारतातील पहिली थलीट आहे. तर १८ वर्षीय डी गुकेश गेल्या महिन्यात चीनच्या डिंग लिरेनला पराभूत करून सर्वात तरुण बुद्धिबळ जगज्जेता ठरला. ही कामगिरी करणारा तो विश्वनाथन आनंदनंतरचा दुसरा भारतीय ठरला आहे.

दुसरीकडे, हरमनप्रीत सिंग टोकियो आणि पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या हॉकी संघाचा एक भाग होता. दुसरीकडे, प्रवीण कुमारने पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ मध्ये पुरुषांच्या उंच उडी-ढ६४ स्पर्धेत आशियाई विक्रम मोडून सुवर्णपदक जिंकले. अर्जुन पुरस्काराने सन्मानित झालेल्या ३२ खेळाडूंपैकी १७ पॅरा-थलीट आहेत.अर्जुन पुरस्कार विजेत्यांमध्ये पॅरिस ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता कुस्तीपटू अमन सेहरावत, नेमबाज स्वप्नील कुसाळे, सरबज्योत सिंग आणि पुरुष हॉकी संघाचे सदस्य हरमनप्रीत सिंग, सुखजीत सिंग, संजय आणि अभिषेक यांचा समावेश आहे.


या खेळाडूंच्या यशाने हे सिद्ध होते की भारतीय क्रीडा विश्वात सातत्याने सुधारणा करण्याच्या दिशेने पावले टाकली जात आहेत. या खेळाडूंनी त्यांच्या कठोर परिश्रम, समर्पण आणि संघर्षाने देशाचा गौरव केला आहे आणि त्यांचे यश केवळ त्यांच्या वैयक्तिक प्रयत्नांचे फळ नाही तर भारतीय क्रीडा संस्कृतीच्या मजबूत पायाचे प्रतीक आहे.

# महाकुंभावर धुके आणि पावसाचे सावट

प्रयागराज : उत्तरप्रदेशच्या प्रयागराज येथे १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी दरम्यान महाकुंभ मेळा आयोजित करण्यात आलाय. त्यानिमित्ताने दररोज कोट्यवधी भाविक त्रिवेणी संगमावर स्नानासाठी येताहेत. परंतु, या परिसरात येते काही दिवस दाट धुके आणि पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. याचा महाकुंभावर परिणाम होण्याची शक्यता आहे. प्रयागराज येथील महाकुंभाच्या चौथ्या दिवशी त्रिवेणी संगमात पवित्र स्नानासाठी ३० लाखांहून अधिक भाविक सहभागी झाले.


दरम्यान भारतीय हवामान खात्याच्या अहवालानुसार, उत्तर प्रदेशातील काही भागात मुसळधार पाऊस आणि धुके पडण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान खात्याने ऑरेंज अलर्ट जारी केला आहे आणि वादळ येण्याची शक्यताही व्यक्त केली आहे. यामुळे या प्रदेशातील आधीच खराब झालेले हवामान आणखी बिघडेल. शनिवार १८ तारखेपासून हवामान आणखी बिघडण्याची शक्यताही आयएमडीकडून वर्तवण्यात आली आहे. यासंदर्भात हवामानतज्ज्ञ सोमा सेन रॉय यांनी सांगितले की, कुंभमेळ्याच्या क्षेत्रात खूप दाट धुके राहण्याची शक्यता आहे. जरी घनता ७० टक्केपेक्षा कमी असली तरी, त्याचा परिणाम तीव्र असू शकतो. त्यामुळे २१ ते २२ जानेवारी दरम्यान उत्तर प्रदेश राज्यातील आग्नेय भागात कुंभमेळा सुरूच राहील, दरम्यान, दाट धुके पडू शकते. तसेच २२ आणि २३ तारखेला पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशात हलका पाऊस आणि वादळाची शक्यता आहे, असे हवामान विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑटो एक्सपो २०२५ चे उद्घाटन



नवी दिल्ली : दिल्लीतील प्रगती मैदानातील भारत मंडपम येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत मोबिलिटी ग्लोबल एक्स्पो-२०२५ (ऑटो एक्स्पो) च्या दुसऱ्या आवृत्तीचे उदघाटन केले. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी देखील पंतप्रधानांसोबत उपस्थित होते. यासोबतच ऑटो कंपन्यांनाही हिरवा कंदील देण्यात आला आहे. आता या ६ दिवसांच्या कार्यक्रमात भारत आणि परदेशातील ऑटो कंपन्या सहभागी होत आहेत.

हा ऑटो एक्स्पो १७ जानेवारी ते २२ जानेवारी दरम्यान चालणार आहे. ऑटो एक्स्पोचे दरवाजे १९ जानेवारी ते २२ जानेवारी दरम्यान सर्वसामान्यांसाठी खुले राहतील. हा कार्यक्रम केवळ ऑटो क्षेत्रासाठी नाही तर हे ऑटो कंपोनेंट, बांधकाम उपकरणे, सायकली आणि भविष्यातील गतिशीलता तंत्रज्ञानाचे कौशल्य देखील प्रदर्शित करेल. भारतात एकाच वेळी एकूण ९ प्रदर्शने आयोजित केली जात आहेत. यावेळी हा भारत मोबिलिटी ग्लोबल एक्स्पो विशेष ठरत आहे कारण यामध्ये १०० हून अधिक नवीन गाड्या लॉन्च केल्या जाणार आहेत. या कार्यक्रमामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या मॉडेलसच्या गाड्या दिसतील. यामध्ये, ऑटो एक्स्पोचा नकाशा पाहून तुम्ही तुमच्या आवडत्या कारचा स्टॉल कोणत्या ठिकाणी आहे ते तपासू शकता. तसेच भारत मोबिलिटी २०२५ हे प्रगती मैदान, द्वारका येथील यशोभूमी आणि ग्रेटर नोएडा येथील एक्स्पो सेंटर या तीन ठिकाणी आयोजित केले जात आहे.




# दिल्ली विधानसभेसाठी भाजपच्या जाहीरनाम्यात महिला, ज्येष्ठ नागरिक केंद्री विविध योजना

नवी दिल्ली, १७ जानेवारी - दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी आज, शुक्रवारी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी जाहीरनामा प्रसिद्ध केला. यात महिला समृद्धी योजनेअंतर्गत प्रत्येक महिलेला दरमहा २,५००, गरीब भगिनींना सिलिंडरवर ५०० ची सबसिडी, तसेच होळी आणि दिवाळीला प्रत्येकी एक सिलिंडर मोफत दिला जाईल, अशा प्रमुख घोषणा केल्या आहेत. या संकल्पपत्रातून आपल्याला संकल्पाकडून सिद्धीकडे वाटचाल करायची आहे, असा निर्धार नड्डा यांनी या निमित्ताने व्यक्त केला.

दिल्लीमध्ये विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. भाजप, आम आदमी पक्ष आणि काँग्रेसमध्ये जोरदार लढत सुरु आहे. येत्या ५ फेब्रुवारी रोजी दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी एकाच टप्प्यामध्ये मतदान होणार आहे. तर येत्या ८ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होऊन निकाल हाती येणार आहे. जाहीरनाम्यात पुढे म्हटले आहे की, दिल्लीमध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या म्हणजेच ६०-७० वयोगटातील पेन्शनमध्ये २००० रुपयांनी वाढ करून २५०० रुपये केले जातील. ७० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांना ३,००० रुपये पेन्शन, विधवा आणि अपंगांना दरमहा ३ हजार रुपये दिले जातील. झोपडपट्ट्यांसाठी अटल कॅन्टीन योजना सुरू केली जाईल, ज्याअंतर्गत ५ रुपयांत जेवण मिळेल. प्रसूती रजा १२ वरून २६ आठवडे, मातृ सुरक्षा वंदनाला अधिक ताकद देण्यासाठी ६ पोषण किट आदी घोषणांचा समावेश आहे.

नड्डा म्हणाले, आम्ही निर्णय घेतला आहे की, दिल्लीत सरकार स्थापन केल्यानंतर पहिल्या मंत्रिमंडळात दिल्लीत आयुष्मान भारत योजना पूर्णपणे लागू करू आणि यासोबतच दिल्ली सरकारकडून ५ लाख रुपयांची अतिरिक्त मदत देऊ. म्हणजेच आयुष्मान भारत योजनेअंतर्गत दिल्लीतील रहिवाशांना एकूण १० लाख रुपयांचे आरोग्य कव्हर मिळेल. सोबतच दिल्लीतील महिलांना 'महिला समृद्धी योजने' अंतर्गत २,५०० रुपये मासिक मदत दिली जाईल, असा निर्णय घेतला आहे.






सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अपघात झाल्यास जखमींना मदत करा -पोलिस अधिक्षक रुपाली दरेकर

### रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत केले आवाहन!



तभा वृत्तसेवा

कन्नड : अपघात समयी जखमींना तातडीची मदत मिळाल्यास एखाद्याचे प्राण वाचतील त्यामुळे अपघात झाल्यास जखमींना तात्काळ मदत करा असे आव्हान पोलीस अधीक्षक महामार्ग सुरक्षा पथक रूपाली दरेकर यांनी केले

तालुक्यातील फार्मसी कॉलेज येथे दि.१७ रोजी रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले पुढे बोलताना दरेकर म्हणाल्या की,महामार्गावर अपघातांचे प्रमाण वाढत असून आपण वाहतूक नियमांचे पालन करावे,बऱ्याच वेळेस आपल्या समोर अपघात होतात पण आपण जखमींना बघून हळहळ व्यक्त करून निघून जातो पण जर आपण त्या जखमींना मदत केली तर त्याचे प्राण वाचतील त्या जखमींला सुद्धा कुटुंब असते कोणाचा तरी भाऊ,बहीण,मुलगा,वडील,आई असू शकते आपल्या एका मदतीने कोणाच्या तरी कुटुंबावर येणारे दुःखाचे डोंगर टळू शकते त्यामुळे आपण जखमींना अपघात समयी मदत करावी असे आवाहन त्यांनी केले

यावेळी पोलिस उपनिरीक्षक राहुल लोखंडे,सय्यद,गौतम थोरात,नरोटे,सहाय्यक फौजदार चव्हान, समाधान दुबिले, अबू बखर,रामनाथ भुसारे, विकास फुटाणे, विनोद तांगडे, श्रीकांत चेलेकर, सोपान झाल्टे, अमर आळंजकर, शांताराम सोनवणे, शरद दळवी, प्रा.निलेश आरके, प्रा. राम इंगळे, प्रा. मयुर जोशी, प्रा. निखिल निकम, प्रा. तृप्ती मोकाशे, प्रा. रुपाली पांडव, प्रा. साक्षी आंभोरे, पूनम कोडग, वैभव मुठ्ठे, प्रा. वैजयंती काकडे, प्रा. दिव्या काकळीज, प्रा. कल्पना लोखंडे, संजय गुंजाळ यांच्यासह मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. अश्विनी जाधव यांनी सूत्रसंचालन केले तर ग्रंथपाल दिपक भगुरे यांनी आभार व्यक्त केले.

## यूटीआय म्युच्युअल फंड सुरू करणार नवीन वित्तीय केंद्र

लातूर-भारतातील प्रमुख आघाडीच्या म्युच्युअल फंड कंपन्यांपैकी एक यूटीआय ॲसेट मॅनेजमेंट कंपनी (यूटीआय एएमसी) ने महाराष्ट्रातील लातूर येथे ग्राउंड फ्लोअर, शॉप क्र. ए-४ निर्मल हाइट्स, नंदी स्टॉप, औसा रोड, लातूर, महाराष्ट्र ४१३५१२ येथे आपले यूएफसी(यूटीआय फायनान्शियल सेंटर) सुरू करण्याची घोषणा केली आहे. देशभरात वितरण व गुंतवणूकदारांना अधिक चांगली सुलभ सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आखण्यात आलेल्या निश्चित विस्तार योजनेचा एक भाग म्हणून कंपनीने २० जानेवारी २०२५ रोजी ३३ नवीन यूटीआय वित्तीय केंद्रे (शाखा) सुरू करण्याची घोषणा केली आहे. या विस्ताराचा उद्देश गुंतवणूकदारांना सहज सेवा उपलब्ध करून देऊन त्यांना माहितीपूर्ण आर्थिक निर्णय घेण्यास मदत करणे आहे. देशभरातील गुंतवणूकदारांशी दृढ संबंध प्रस्थापित करण्यासाठी व अधिक समावेशक गुंतवणूक संस्कृतीस प्रोत्साहन देण्यासाठी यूटीआय एएमसी च्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा हा महत्त्वाचा भाग आहे.

## राज्यस्तरीय शालेय किक-बॉक्सिंग स्पर्धेसाठी यशोधन पवन घुगेची निवड



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १७ : जालना जिल्हा येथे दि १३ डिसेंबर रोजी विभागीय किक बॉक्सिंग क्रीडा स्पर्धा, आयोजित झाल्या होत्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत झालेल्या विभागस्तर शालेय किक-बॉक्सिंग स्पर्धेत छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचा गुणवंत खेळाडू यशोधन घुगे मिशन मार्शल आर्टस अँड वूशू कुंग-फू स्पोर्ट्स कराटे असोसिएशन व ब्लू व्हॅली शाळेचा विध्यार्थीयाने विभागीय किक -बॉक्सिंग स्पर्धेत वजन गट ३५ मध्ये प्रथम स्थान मिळून विजय प्राप्त केला तसेच कु.यशोधन घुगे ची निवड सातारा जिल्हा येथे राज्यस्तरीय किक -बॉक्सिंग साठी झाली आहे दिनांक १८ व १९ जानेवारी २०२५ रोजी तो वजन गट ३५ किलो मध्ये खेळणार आहे.या बद्दल मिशन मार्शल आर्टस संघटनेचे अध्यक्ष पवन घुगे, सचिव प्रविण घुगे, क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई,माजी क्रीडा अधिकारी गोकुळ तांदळे, परभणी जिल्ह्या संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालासाहेब बुधवंत, प्रशिक्षक राम बुधवंत, श्याम बुधवंत, राम चौरे, गौरव टोकटे, कृष्णा कानडे ब्लु व्हॅली शाळेचे अध्यक्ष सतीश तोतलला व छत्रपती संभाजीनगर जिल्हा महिला संघटक राधा घुगे, नंदा घुगे, कोमल राठोड, ऋतुजा रणवळकर, ऋतुजा भालेराव, धनश्री सिदवाडकर, आदीने शुभेच्छा दिल्या आहेत

### वेरूळ येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची जिल्हा मेळावा

## व्यक्तीनिष्ठेपेक्षा पक्ष निष्ठेशी बांधिलकी ठेवा- जिल्हाध्यक्ष आ. कैलास पाटील



तभा वूतसेवा

खुलताबाद प्रतिनिधी .राजकारणात काम करीत असतांनी कार्यकर्त्यांनी व्यक्तीनिष्ठेपेक्षा पक्ष निष्ठेशी बांधीलकी ठेवावी असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष माजी आ कैलास पाटील यांनी वेरूळ येथील आज बुधवारी झालेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा मेळाव्यात बोलतांनी केले.

या मेळाव्यास माजी आ. नितीन पाटील, प्रदेश सरचिटणीस एकनाथ गवळी, किसान सभेचे शिवाजी बनकर, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष मोहसीन पटेल, खुलताबाद तालुकाध्यक्ष साईनाथ जाधव, , गंगापूर तालुकाध्यक्ष हरीभाऊ डव्हाण, उद्योजक मनोज पवार, कन्नड शहराध्यक्ष अहेमद अली , बादशाह पटेल, विजय पवार, वैजापूर चे अँड प्रताप निंबाळकर,, विजय वरकड, राजकुमार पांडे, बबन आवटे भाऊसाहेब पाटील तरमाळे दिनेश सावजी बाबासाहेब दांडगे, शेख कलीम,आदीसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

जिल्हाध्यक्ष कैलास पाटील यांनी मार्गदर्शन करतांनी सांगितले की, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जिल्हाभरात शिंदेसेना, भाजपाचे वर्चस्व असल्याने सहजासहजी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला जास्तीच्या जागा देणार नाहीत असे एकंदरीत चित्र असून त्या करिता आपसात हेवेदावे न करता लढविलेल्या जागा कशा निवडून येतील याकडे लक्ष द्या असा मोलाचा सल्ला दिला.

(जिल्हाध्यक्ष-कैलास पाटलांना विधान परिषदेवर घ्या

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा एकही आमदार नसल्याने राजेश विटेकर यांची रिक्त झालेली जागा जिल्हाध्यक्ष कैलास पाटील यांना देण्याची मागणी पदाधिकारी यांनी या मेळाव्यात केली होती. यावर कैलास पाटील यांनी सदरील रिक्त जागी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अनुभवी माणसाला द्या असे सांगून पक्ष वाढला पाहिजे हे महत्त्वाचे आहे, जिल्हाभरात स्थानिक स्वराज्य संस्थेत जागा वाढल्या पाहिजे असे ही ते म्हणाले. सुत्रसंचालन रवी माहोरकर यांनी तर शहराध्यक्ष मुजीबोद्दीन यांनी मानले. )

## डोंगरगाव तालुका सिल्लोड ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी इमरान अब्दुलरेहमान पठाण यांची बहुमताने निवड



सिल्लोड( प्रतिनिधी ) डोंगरगाव तालुका सिल्लोड ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी इमरान अब्दुलरेहमान पठाण यांची बहुमताने निवड करण्यात आली ग्रामपंचायतीचे तत्कालीन उपसरपंच अन्वर पठाण यांनी राजीनामा दिल्याने उपसरपंच पद रिक्त होते उपसरपंच पदाच्या निवडीसाठी मंडळ अधिकारी भगतसिंग पाटील यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक घेण्यात आली तित उपसरपंच पदासाठी इमरान पठाण व चंद्रकांत फुटाणे यांनी नामांकन दाखल केल्याने निवडणूक घेण्यात येऊन पठाण यांना १३ चंद्रकांत फुटाणे यांना ४ मते मिळाली निवडीनंतर ग्रामस्थांनी फटाक्यांची आतिश बाजी करत जल्लोष साजरा केला उपसरपंच पदाच्या निवडीसाठी सरपंच निजाम पठाण ग्रामपंचायत सदस्य जलील कारभारी अंकुश उंबरे भागाजी सागरे अन्वर पठाण ज्योती सपकाळ राबिया पठाण प्रतिभा शेवाळे शाईन पठाण बुगदाद पठाण शगीरा बी देशमुख अस्मिता सरोदेयांनी सहाय्य केले गाव पातळीवरील मूलभूत प्रश्न सोडवण्या कामी प्रशासनाच्या माध्यमातून आपण कार्य करू असे यावेळी नवनिर्वाचित उपसरपंच इम्रान अब्दुलरेहमान पठाण यांनी सांगितले तलाठी चंद्रकांत वाघ ग्रामसेवक पीव्ही हुमणे ग्रामपंचायत कर्मचारी सुभाष सागरे कृष्णा गायकवाड उमर पठाण इरफान पठाण रोजगार सेवक यांनी परिश्रम घेतले.

## शिवाजी नागरी बँकेचा ३५ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

पैठण दि १७ :- येथील शिवाजी नागरी सहकारी बँकेचा ३५ वा वर्धापण दिन आज मोठया उत्साहात मुख्य कार्यालय पैठण येथे साजरा करण्यात आला.तालुक्याचे मा.आमदार तथा संस्थापक अध्यक्ष स्व.शिवाजीराव साहेबराव काळे व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस् पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

ग्रामीण भागातून पैठण नगर परिषदेच्या हद्दीत रिझर्व बँक ऑफ इंडिया यांनी रुपये २ लाखाच्या भाग भांडवला वर संस्थापक अध्यक्ष मा. आमदार शिवाजीराव काळे यांनी १६ जानेवारी १९९० ला बँकेची स्थापना केली. आज रोजी बँकेचे वटवृक्षात रूपांतर होऊन चार शाखासह बँकेने २०० कोटी ठेवीचा टप्पा पार केलेला आहे.

बँक सतत २५ वर्षांपासून नफ्यात असून, बँकेने 'अ ' वर्ग ऑडिट चे सातत्य कायम राखलेले आहे. बँकेने सभासद, ठेविदार, हितचिंतक यांचा विश्वास संपादित करून, स्व.शिवाजीराव काळे यांचा आदर्श समोर ठेवून त्यांच्या प्रेरणेने विद्यमान चेअरमन रवींद्र दादा काळे व संचालक मंडळ यशस्वी पणे कार्य करत आहेत.

या प्रसंगी बँकेचे चेअरमन रवींद्र काळे, व्हा.चेअरमन भाऊसाहेब पा.औटे,रामचंद्र काळे, शंकरराव राऊत, अशोक जाधव, हरीपंडित गोसावी, दशरथ सोनवणे,राजेंद्र टेकाळे, शामसेठ लोहिया , पृथ्वीराज चव्हाण, कारभारी लोह्करे,पाशा धांडे, अरुण नरवडे,राजेंद्र धरपळे, सोमनाथ परदेशी, सतीश बलदवा, फाजलं टेकडी, नरसिंग लोहिया, सिद्धेश्वर उगले,जितू परदेशी,अशोक नरके, उदयसेन काळे, यशवंत काळे,अरुण काळे, अरुण बल्लाळ,डॉ. पंडित किल्लारीकर,प्रा. संतोष गव्हाणे,नाथशेट पोरवाल,महेश जोशी, नरहरी,जाधव,गौरव राऊत,बिजेश मैद, उत्तमराव जाधव, अंबादास ढवळे, एकनाथ खंडागळे, ज्ञानेश्वर औटे, दादासाहेब औटे, प्रवीण औटे, ज्ञानेश औटे, मच्छिन्द्र मिसाळ, सर्व पतसंस्थेचे अधिकारी,पत्रकार मंडळी आदी उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी ई आय पठाण, उप मुख्य कार्यकारी जी.व्ही.म्हस्के,विजय पोषणगीर,बाळासाहेब दसपुते,सुधाकर शिंदे, रत्नदीप मुळे,कृष्णा काकडे,ईश्वर ढोकळे,पवन काळे,मेघा श्रीवास्तव, किशोर धोकटे आबेद् पठान्, भाऊसाहेब कणसे, फौजदार जाधव,रेवती राजनिकर,आकाश राजळे,प्रकाश सोनवणे,अमर तावरे,सलीम शेख, मंदा मोरे आदिनी परिश्रम घेतले.

## भगवती विद्यालय मध्ये राष्ट्रीय तंबाखू मुक्त नियंत्रण कार्यशाळा संपन्न



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १७ जानेवारी भगवती विद्यालय, बिडकीन ता. पैठण येथे दि १५ जानेवारी रोजी राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक एकनाथ राशींनकर होते, या वेळी प्रहारी क्लबचे सचिव सुनील पवार, व विज्ञान शिक्षक खुशाल चव्हाण यांनी तंबाखू व इतर मादक पदार्थ यांचे दुष्परिणाम यावर सखोल मार्गदर्शन केले तसेच मुख्याध्यपक एकनाथ राशींनकर यांनी मोलाचे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना तंबाखूमुक्तीची शपथ दिली.यानिमित्त शाळेत निबंध, चित्रकला, रांगोळी या स्पर्धा घेण्यात आल्या या कार्यक्रमाचे संचलन श्रीधर जऱ्हाड यांनी केले तर आभार रामनाथ धनवे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रायभान रकटे,आप्पा किसवे. विश्रांती सलगरे, आशुतोष झारगड, अशोक डुबे, सुभाष राठोड यांनी सहकार्य केले.

## चौथ्या राष्ट्रीय स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा तृतीय क्रमांक



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १७ जानेवारी छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या चौथ्या राष्ट्रीय स्पर्धेत छत्रपती संभाजी नगर येथील प्रहार मार्शल आर्ट ह्या अकॅडमीने तृतीय क्रमांक पटकावून मानाचे स्थान मिळवले आहे.

यात संबंधित महाराष्ट्रातील संपुर्ण जिल्ह्यातील खेळाडू सहभागी झाले होते यात प्रहार मार्शल आर्ट्र्सच्या खेळाडुंनी उत्कृष्ट प्रदर्शन करून १७ गोड मेडल १३ सिल्वर मेडल व ४ ब्राँझ असे पदके प्राप्त करून तृतीय क्रमांकाचा मान मिळवला आहे. श्रावणी पाटील, क्रती गुप्ता, अविका जोशी, दुर्गेश राऊत, सुर्यकांत मिरगे, धनुष शेरमाले, प्रत्युष डहाके, वेदिक गाढे, अथर्व अग्रवाल,प्रणव धोतरे,अर्चित शिखरे,निरुब तंडण,श्रेयांश कपूर, आयांश सिंग, सक्षम भगत, केशव गायकवाड, अद्विक राठोड, इत्यादी खेळाडुंनी राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला होता विजयी झालेल्या खेळाडुंची प्रहार मार्शल आर्ट्स असोसिएशन ऑफ भारत याचे अध्यक्ष निलेश पाटील सर, सचिव सागर महाजन सर, उपाध्यक्ष दुर्गेश पाटील सर ,ओम पाटील सर व महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अनिल पाडळकर सर व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मतदान यंत्र पडताळणीबाबत राजकीय पक्षप्रतिनिधींची बैठक

छत्रपती संभाजीनगर, दि.१७(जिमाका)- विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ च्या अनुषंगाने आज जिल्हाधिकारी कार्यालयात मतदान यंत्र पडताळणीची मागणी केलेल्या राजकीय पक्ष प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली.

## सोयगाव-शेंदुर्णी व फर्दापूर-चाळीसगाव राज्य मार्गासाठी सोयगाव कर करणार रस्ता रोको; निवेदन सादर



तभा.वृत्तसेवा

सोयगाव दि.१६ जानेवारी : सोयगाव- शेंदुर्णी व फर्दापूर -चाळीसगाव राज्य मार्गासाठी दि.२२ जानेवारी ला सार्वजनिक बांधकाम विभागाविरुद्ध रास्ता रोको करण्याचा इशारा सोमवारी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग फर्दापूर यांना निवेदन दिले आहे.

सोयगाव तालुक्यातून एकमेव सोयगाव- शेंदुर्णी व फर्दापूर -चाळीसगाव हे दोन मुख्य रस्ते जोडणी करण्यात आले आहे परंतु या रस्त्यांची दुर्दशा झालेली असून या दोन्ही रस्त्यावर अपघाताची मालिका सुरु झाली आहे यात सोयगाव ते शेंदुर्णी हा सात किमी चा रस्ता अतिशय खराब झालेला आहे. लेखी निवेदनात नमूद केले असून दि.२२ जानेवारीला सोयगाव शहरातून जाणाऱ्या या दोन्ही रस्त्यावर रस्ता रोको करण्यात येणार असल्याचा इशारा फर्दापूर येथील कार्यालयात दिलेल्या निवेदनात ग्रामस्थांनी नमूद केला आहे.

सोयगाव तालुक्यातील शेंदुर्णी आणि चाळीसगाव या दोन्ही रस्त्यावर खड्डे च खड्डे झालेले आहे त्यामुळे हे रस्ते अपघाताना निमंत्रण देणारे ठरले आहे सोयगाव- शेंदुर्णी हा सात किमी चा रस्ता मृत्यूचा सापळा झाला आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन देण्यात आले असल्याचे भाजपचे सुनील गवांडे यांनी सांगितले.या निवेदनावर सुनील गवांडे,मंगेश सोहनी,राजेंद्र जावळे,वसंत बनकर,रमेशचंद्र कोटेचा,संजू ताडे,मयूर मनगटे,आदींच्या स्वाक्षऱ्या आहे.

## यशस्वी गुंतवणुकीसाठी बहु-आधारित जोखीम-पुरस्कार दृष्टीकोन



पुणे : गुंतवणूकदार नेहमी त्यांच्या गुंतवणुकीच्या निर्णयांवर नियंत्रण ठेवू शकणारे मार्गदर्शक किंवा शैली शोधतात. स्मार्ट-बेटा किंवा फॅक्टर गुंतवणूक, जी निष्क्रिय मार्गाने केली जाते, गुंतवणूकदारांचे लक्ष वेधून घेते. कारण ते त्यांच्यासाठी अनेक महत्त्वाचे पॅरामीटर्स पूर्ण करते, ज्यात गेल्या काही वर्षांमध्ये मजबूत कामगिरी प्रमुख पैलू राहिलेला आहे. ऑक्टोबर २०२४ पर्यंत, घटक-आधारित निधीचा एयूएम (सेट्स अंडर मॅनेजमेंट) ३५,७८२ कोटी रुपये होता, जो ऑक्टोबर २०२० मध्ये केवळ ४०५ कोटी रुपयांच्या तुलनेत ८८ पट अधिक आहे.

एसीई एमएफ डेटानुसार, या क्षेत्रातील गुंतवणूकदारांची आवड दर्शवते. आता घटक हे पॅरामीटर्स आहेत, जे फिल्टर करण्यासाठी आणि गुंतवणूकीचे निर्णय घेण्यासाठी वापरले जातात. लोकप्रिय घटकांमध्ये गती/अल्फा, कमी अस्थिरता, गुणवत्ता, मूल्य आणि आकार (कमी मार्केट कॅप आधारित) यांचा समावेश होतो. गुंतवणूकदारांना मोमेंटम फॅक्टर सर्वाधिक आवडतो. स्मार्ट बेटा किंवा घटक रणनीती हे सक्रिय आणि निष्क्रिय गुंतवणूक शैलींचे सर्वोत्तम मिश्रण आहे. घटक रणनीती धोरणे नियम-आधारित दृष्टीकोनचा अंगीकार करते. ज्यांचा उद्देश्य मानक बेंचमार्क आणि व्यापक बाजारात सर्वोत्तम रिटर्न प्रदान करणे आहे. या शैलीतील प्रत्येक घटकाला समर्पित निर्देशांक असतात, जे विशिष्ट पॅरामीटर्सवर आधारित स्टॉक फिल्टर करतात. घटक गुंतवणुकीची शैली संशोधन-आधारित आणि नियम-आधारित आहे. यात मानवी पूर्वाग्रहापासून मुक्त आहे आणि उच्च जोखीम-पुरस्कार परताव्याची क्षमता तसेच उत्तम पोर्टफोलिओ विविधता प्रदान करते.

बंधन एएमसीचे प्रमुख सिर्षेंदु बसू म्हणाले, नकारात्मक पैलूंमध्ये कोणत्याही घटकाचे चक्रीय स्वरूप समाविष्ट आहे, जे कमी कामगिरीचे कालावधी, वेळेत प्रवेश आणि गुंतवणूकीतून बाहेर पडण्यासाठी आव्हाने आणि स्टॉक/सेक्टर एकाग्रता निर्माण करू शकतात. या नकारात्मक पैलूंवर मात करण्यासाठी आणखी एक दृष्टिकोन स्वीकारला जाऊ शकतो.

घटकांचे संयोजन

बसू म्हणाले की, बहु-घटक दृष्टिकोनामध्ये अनेक घटक किंवा शैली एकत्र करणे समाविष्ट असते, ज्यामुळे परिणाम सुधारतात. विविध बाजार परिस्थितींना भिन्न प्रतिसाद देणाऱ्या घटकांमध्ये विविधता आणून, ही रणनीती एकाग्रता जोखीम कमी करण्यास आणि पोर्टफोलिओ स्थिरता वाढविण्याचा प्रयत्न करण्यास मदत करते. बहु-घटक धोरणांमध्ये सामान्यतः वापरल्या जाणाऱ्या घटकांमध्ये मूल्य, गती, गुणवत्ता, कमी अस्थिरता आणि अल्फा हे एकतर टॉप-डाउन दृष्टिकोन वापरून तयार केले जाऊ शकतात, ज्यामध्ये विविध घटक निश्चित प्रमाणात एकत्र केले जातात (उदा. ५०:५०, ७०:३०), किंवा बॉटम-अप दृष्टीकोन वापरला जाऊ शकतो, जो वैयक्तिक स्टॉक स्तरावर विभागला जातो. घटक समाकलित करते. टॉप-डाउन दृष्टीकोन सोपा आणि लवचिक आहे, परंतु सेक्टर किंवा स्टॉकमध्ये लक्षणीय ओव्हरलॅप होऊ शकते. याउलट, बॉटम-अप दृष्टीकोन अधिक क्लिष्ट आहे, परंतु ते ओव्हरलॅप कमी करते आणि इच्छित घटक एक्सपोजरचे अचूक लक्ष्यीकरण सुनिश्चित करते. बऱ्याचदा, पोर्टफोलिओची स्थिरता वाढवण्यासाठी आणि परिणाम सुधारण्याच्या प्रयत्नात एकमेकांशी कमी सहसंबंधित घटकांचे संयोजन केले जाते.

## फर्दापूर येथे अखंड संगीतमय श्रीराम कथा संपन्न



तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि १७ श्री राम मंदिर येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही संगीतमय श्रीराम कथा आयोजित करण्यात आली होती

शुक्रवारी काल्याच्या किर्तनाने या कथेचे समारोप करण्यात आला यावेळी सकाळी श्री राम मंदिर येथून श्री राम यांच्या ग्रंथाची मिरवणूक गावातून वाजत गाजत काढण्यात आली यावेळी गावातील बालगोपाल महिला पुरुष या मिरवणुकीत सहभागी झाले असुन यानंतर काल्याचे किर्तन हभप गजानन महाराज वरसाडेकर यांच्या किर्तनाने समारोप करण्यात आला तसेच यावेळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी भाविक भक्त यांनी महाप्रसादाचा लाभ घेतला

## व्यवसायात यशासाठी ‘मर किंवा मार’ हा निर्धार गरजेचा : डॉ धनंजय दातार




छत्रपती संभाजीनगर,१७ जानेवारी २०२५ : आज प्रत्येक क्षेत्राप्रमाणे व्यवसायातही तीव्र स्पर्धा आहे. व्यवसायात प्रवेश करणे सोपे असले तरी टिकून राहणे अवघड असते. व्यवसाय हा विरंगुळ्यासाठी किंवा दानधर्मासाठी करायची गोष्ट नसून त्यात नफा हे एकमेव ध्येय समोर ठेवावे लागते. त्यामुळे व्यवसायात यश मिळवायचे असेल तर नवउद्योजकांनी कामाची लाज न बाळगता मेहनत करावी आणि ‘मर किंवा मार’ (डाय ऑर किल) अशा निर्धारानेच पाय रोवून उभे राहावे, असा सल्ला दुबई स्थित ‘अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्स’चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांनी नवउद्योजकांना दिला.

‘आकार डिजी ९’ न्यूज चॅनलतर्फे आयोजित आणि ‘ट्रायझॉन कॉर्पोरेट सर्व्हिसेस’ तर्फे प्रस्तुत ‘दुबई बिझनेस कॉन्क्लेव्ह २०२५’ या कार्यक्रमात ते बोलत होते. दुबईतील इंडिया क्लबच्या उत्सव हॉलमध्ये हा कार्यक्रम नुकताच झाला. मराठी उद्योजकांना दुबईत व्यवसाय करण्याची संधी मिळावी व बाजारपेठ उपलब्ध व्हावी, या हेतूने आकार ‘डिजी ९’चे संस्थापक प्रभाकर सूर्यवंशी यांनी या बिझनेस टूरचे आयोजन केले होते. दुबईतील प्रथितयश मराठी उद्योजकांशी त्यांनी या कार्यक्रमात संवाद साधला.

धनंजय दातार म्हणाले, मी ४० वर्षांपूर्वी दुबईत आलो त्यावेळी जी स्पर्धा होती त्याहून अधिक प्रचंड स्पर्धा सध्या आहे. जगभरातून अनेक उद्योजक या करमुक्त बाजारपेठेचा लाभ घेण्यासाठी येथे गर्दी करत आहेत. अशावेळी आपले अस्तित्व राखायचे असेल तर दुसऱ्यावर मात करावीच लागते. व्यवसाय हा फक्त नफ्यासाठीच करायचा असतो. नफ्याचे मार्जिन कमी ठेऊनही आपण स्पर्धेत तग धरु शकतो. मात्र झटपट नफ्याच्या आशेने आलेल्यांना उतावीळपणाने काही मिळत नाही.

दुबईसारख्या बाजारपेठेत व्यवसायात टिकून राहण्यासाठी संयम लागतोच, परंतु येथील कायद्यांचे काटेकोर पालनही करावे लागते, असे सांगून ते म्हणाले, की नवजात अर्भक जसे तीन वर्षांनी चालायला, बोलायला व स्वतःहून खायला लागते तसेच कोणताही नवा व्यवसाय किमान १००० दिवस चिकाटीने चालवला तरच तो स्वतःच्या पायावर उभा राहतो. मराठी तरुणांनी बदलत्या काळात स्वतःची पारंपरिक बुजरी आणि संकोची वृत्ती सोडून देऊन धाडसाने आपला व्यवसाय जागतिक बाजारपेठांत पोचवला पाहिजे. गुणवत्तापूर्ण उत्पादने व अभिनव सेवा स्पर्धात्मक किंमतीत देऊ केल्यास ते हमखास यशस्वी होतील. ‘गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरम’चे उपाध्यक्ष राहुल तुळपुळे म्हणाले, की कोणताही व्यवसाय सुरू करताना ग्राहकांना कशाची गरज आहे याचा विचार करुन संधी कशी साधता येईल, याचा विचार नवउद्योजकांनी करावा. गेल्या काही वर्षांत दुबईत बाहेरुन येणाऱ्या व्यावसायिकांची संख्या वाढली असल्याने प्रत्येक क्षेत्रात संधी आहे, हे आढळत आहे.

‘बीसीडब्ल्यू इन्शुरन्स कन्सल्टन्सी’चे व्यवस्थापकीय संचालक विवेक कोल्हटकर यांनी जोखीम व्यवस्थापनाविषयी (रिस्क मॅनेजमेंट) मार्गदर्शन केले. दुसऱ्या देशात व्यवसाय करताना तेथील बाजारपेठेचा अभ्यास करुन व कल बघून मगच पाऊल टाकावे. मराठी तरुणांना दुबईत व्यवसाय संधींचे मार्गदर्शन करण्यासाठी व दिशा देण्यासाठी गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरम कार्यरत आहे, असे त्यांनी नमूद केले.

संयुक्त अरब अमिरातीत (युएई) अनेक वर्षांपासून आरोग्यक्षेत्रात सेवा देणारे डॉ. संजय पैठणकर तसेच या कार्यक्रमाचे प्रायोजक ‘क्विक हील’चे ओंकार शेणोलीकर आपले अनुभव सांगितले. श्री. शेणोलीकर यांनी तंत्रज्ञानसंबंधित व्यवसायांबद्दल माहिती दिली. इतिहासात अटकेपार झेंडा रोवणारा मराठी माणूस कोणत्याही क्षेत्रात मागे नसून अनेक मराठी उद्योजकांनी भारताबाहेर महाराष्ट्राचे नाव मोठे केले आहे. त्यांचा आदर्श घेऊन आगामी काळात अनेक मराठी उद्योजक नक्की घडतील, असा विश्वास प्रभाकर सूर्यवंशी यांनी व्यक्त केला. श्र्वेता घालवाडकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# रा.स्व.संघाचे कार्य आणि हेतू शुद्ध असल्यामुळे संघ कार्यकर्त्यांनी संघाची बाजू लढाऊपणे मांडली पाहिजे : पद्मश्री रमेश पतंगे

## 'आम्ही संघात का आहोत पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न'

छत्रपती संभाजीनगर : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ ला झाली तेव्हापासून सामाजिक समता आणि सामाजिक समरसता संघ विचाराचा आणि कार्यपद्धतीचा कणा राहिला आहे परंतु मधल्या काळात संघ हा मनुवादी आहे संघ हा विषमतावादी आहे संघ स्त्रीविरोधी आहे संघ अस्पृशतावादी आहे मनुवाद्याचे राज्य यांना इथे आणायचे आहे अशी टीका मोठ्या प्रमाणात सुरू झाली होती आणि अजूनही चालू आहे मराठवाड्यातील प्रामुख्याने छत्रपती संभाजीनगर मधील तथाकथित स्वतःला बुद्धिमान समजणाऱ्या लेखकांनी जी पुस्तके प्रकाशित केली त्या पुस्तकात हा विषारी प्रचार मोठ्या प्रमाणात होता .रमेश पतंगे म्हणाले या सर्वांशी लढायचे असेल तर तुम्ही किती सशक्त आहात याला महत्त्व नाही तर प्रतिस्पर्ध्याकडे शस्त्रे कोणती आहेत तो कोणत्या शस्त्राने वार करणार आहे हे जाणून घ्यावे लागते .ही वैचारिक लढाई आहे या सर्वांना उत्तर देण्यासाठी मी मनू आणि संघ हे पुस्तक मी १९८६ साली लिहिले.

पद्मश्री रमेश पतंगे 'आम्ही संघात का आहोत' या पुस्तक प्रकाशन प्रसंगी डॉ. दिवाकर कुलकर्णी यांनी घेतलेल्या मुलाखतीत विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देत होते यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रांत संघचालक मा.अनिलजी भालेराव व प्रमुख वक्ते पश्चिम क्षेत्र कार्यकारणी सदस्य हरीशजी कुलकर्णी उपस्थित होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संभाजीनगर मधील बीड बायपास रोडवरील एमआयटी जवळील संघाच्या प्रांत कार्यालयात दिनांक १६ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता 'आम्ही संघात का आहोत' या पुस्तकाचा प्रकाशन सोहोळा संपन्न झाला.यासाठी संभाजीनगर शहरातील पाचशेहून अधिक स्वयंसेवक उपस्थित होते.




यावेळी संपन्न झालेल्या मुलाखती दरम्यान डॉक्टर दिवाकर कुलकर्णी यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची रमेश पतंगे यांनी स्पष्ट शब्दात उत्तरे दिली.

संघ स्वयंसेवक किंवा संघ परिवाराबाबत फेक नॅरेटिव्ह पसरवणारे महामूर्ख आहेत,गाढव आहेत,वाचाळ वीर आहेत असा घणाघात पतंगे यांनी केला. प्रत्येक राष्ट्राचे अस्तित्व हे संविधानावर अवलंबून आहे विशेषतः भारतीय संविधान सर्वश्रेष्ठ आहे कारण भारतीय संविधानात राष्ट्राची अनेक


जिवनमूल्ये उत्तम रीतीने प्रकट झाली आहेत भारतीय संस्कृतीचा परंपरेचा गाभा संविधानातून प्रकट झाला आहे भारतीय संविधान हे वैशिष्ट्यपूर्ण तर आहेच परंतु राष्ट्राला एकत्र बांधणारे आहे असे स्पष्ट करतेवेळी पद्मश्री पतंगे यांनी सर्वश्रेष्ठ असणारे भारतीय संविधान बदलणे ही अशक्यप्राय गोष्ट असल्याचे नमूद केले.

संघाच्या राजकीय भूमिका बाबत विचारलेल्या प्रश्नावर देखील त्यांनी समर्पक उत्तर दिले ते म्हणाले संघ राजकीय भूमिका घेत नाही परंतु राष्ट्रप्रथम या विषयावर जेव्हा आघात होतो तेव्हा संघ पुढे सरसावतो मदत करतो असे रमेशजी यांनी नमूद केले

अलीकडे देशात विविध विषयावर फेक नॅरेटिव्ह पसरवून मोठ्या प्रमाणात अराजकता पसरण्याचे प्रकार पद्धतशीरपणे सुरू आहेत. आराजकता पसरवण्याच्या षडयंत्रविरुद्ध संघ असो की संघ परिवार निश्चितच राष्ट्रहिता करता अग्रेसर राहील हे षडयंत्र राहून पडेल असे त्यांनी सांगितले. पुस्तक प्रकाशनानंतर प्रमुख वक्ते हरीशभाऊ कुलकर्णी यांनी आम्ही सांगत आहोत या पुस्तकाच्या अनुषंगाने आपले विचार व्यक्त केले या प्रकाशन सोहळ्याचा समारोप प्रमुख अतिथी प्रांत संघचालक अनिलजी भालेराव यांनी केला कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलन आणि भारत माता पूजनानंतर राजीव जहागीरदार यांनी प्रास्ताविक केले

वैभव पांडे यांनी 'जहा दिव्यता ही जीवन है' हे वैयक्तिक गीत सादर केले आभार प्रदर्शन अविनाश औंढेकर यांनी केले शेवटी महर्षी पानिनि कन्या वेद पाठशाळेतील विद्यार्थिनींनी म्हटलेल्या शांतिमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. प्रकाशन सोहळ्यास ज्येष्ठ प्रचारक श्री मधुभाई कुलकर्णी विभाग संघचालक मुंजाजीराव जगाडे विभाग सहसंघचालक कन्हैयालालजी शहा सर्व जिल्हा संघचालक नगर संघचालक तसेच कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. प्रकाशन सोहळा यशस्वी करण्यासाठी श्री संतोष पाठक चेतन पगारे अविनाश औंढेकर योगेश भोसले महेश कानगावकर यांनी मेहनत घेतली

## संघ हीच जीवनगाथा



### अलक (१६) सौभाग्य

पूजनीय डॉक्टरांना गोळवलकर गुरुजींची कुशाग्र बुद्धी, वाक्- पटूता, कर्तुत्व शक्ती, दुसऱ्याला प्रभावित करण्याची क्षमता, भौतिक सुखोपभोगाप्रति उदासीनता आदि गुण आवडले होते. त्यांनी मनोमन ठरवलं होतं, हाच खरा संघाचा आपल्या नंतरचा वारस. आणि मग डॉक्टरांनी गुरुजींना आपल्याबरोबर नागपूर - भंडारा- उमरेड- रामटेक- अकोला आदि ठिकाणी झालेल्या संघ वर्गावर सोबत नेले. डॉक्टरांनी त्यांना पंजाब-बंगाल- पुणे- मुंबई- आदि ठिकाणी पण संघाचे दर्शन घडवले. आणि आमच्या राष्ट्राचे सौभाग्य हेच की डॉक्टर हेडगेवार हे गुरुजींसाठी- आकर्षित करणारा जबरदस्त शक्तीचा लोहचुंबक ठरले. आणि डॉक्टरांच्या राष्ट्रीय कर्मयोगाकडे गुरुजी अधिकाधिक. आकर्षित होऊ लागले. आणि ते गतीने संघमय झाले. (क्रमशः)

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# गिळलेला खिळा कोणतीही शस्त्रक्रिया न करता काढला

छत्रपती संभाजीनगर - नुकत्याच घडलेल्या एका प्रसंगामध्ये पुण्यात सुतारकाम करणार्या १८ वर्षीय रुगाने काम करत असतांना चुकून एक खिळा गिळला. त्याला बाणेरच्या मणिपाल हॉस्पिटल मध्ये आणण्यात आले, त्याच्या पोटात खूप दुखत होते, म्हणून तत्काळ त्याचा एक्स रे काढण्यात आला. एक्स रे तून असे आढळून आले की त्याच्या आतड्याच्या वरच्या भागात एक अचकुचीदार खिळा अडकला आहे. अशा अणकुचीदार पदार्थांमुळे अंतर्गत जखमा होण्याची अधिक शक्यता असते. ही गंभीर बाब लक्षात घेऊन डॉ. प्रसाद भाटे यांच्या टिमने वेगाने काम करत हा खिळा काढण्यासाठी एन्डोस्कोपी करण्याचा निर्णय घेतला.

# शालिवाहन पतसंस्थेच्या वतीने दिव्यांगांसाठी मोफत जयपुर फुट शिबिराचे आयोजन

तभा वृत्तसेवा

पैठण दि १६ :- पैठण येथे शालिवाहन नागरी सहकारी पतसंस्था व पुणे येथील साधू वासवणी मिशन यांचे संयुक्त विद्यमाने मोफत कृत्रिम हात व पाय आर्टिफिशियल लिंब कॅम्प बसविण्याचे जयपुर फुट शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थेचे चेअरमन किशोर चौहान यांनी दिली.

रविवार दिनांक ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत पैठण येथे बस स्टँड जवळ शालिवाहन पतसंस्थे समोरील प्रांगणात या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. बँकिंग क्षेत्राबरोबरच विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात महाराष्ट्रात अग्रेसर असेलेली पैठण येथील शालिवाहन पतसंस्था व साधू वसवाणी मिशन, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने हा सामाजिक उपक्रम दर दोन वर्षांनी राबविला जातो. या शिबिराच्या माध्यमातून आज पर्यन्त सुमारे ३५०० दिव्यांगांना कृत्रिम अवयवांचे मोफत वाटप करण्यात आले असून अनेक दिव्यांगांचे अपंगत्व दूर झाले आहे.

या शिबरामध्ये साधू वासवाणी मिशन चे तज्ञ डॉक्टर दिव्यांगांची तपासणी करणार असून शिबिराचा लाभ घेण्यासाठी शालिवाहन पतसंस्था, पैठण तसेच संस्थेच्या सर्व शाखा चितेगाव, पाचोड, गारखेडा, वाळूज, गंगापूर, वैजापुर, शेवगाव, पाथर्डी, अंबड, कन्नड, सिल्लोड व येवला येथे नाव नोंदणी करावी. अधिक महितीसाठी मोबाइल क्र. ८८८८८६८७३२ व ९९२१४११६८५ या क्रमांकावर संपर्क करावा व गरजू दिव्यांगांनी या मोफत जयपुर फुट शिबिरचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे चेअरमन किशोर चौहान व सर्व संचालकांनी केले आहे.

# पुण्यासारखे छत्रपती संभाजीनगर मध्ये नाट्यगृहात सिनेमा दाखवणार असाल तर पहिला सिनेमा मी देतो: सुबोध भावे



छत्रपती संभाजी नगर (नारायण गायकवाड) पुणे येथे मराठी चित्रपट हे नाट्यगृहात दाखवण्याची मोहीम आम्ही सध्या चालू केली आहे याच प्रमाणे जर छत्रपती संभाजीनगर मध्ये नाट्यगृहात चित्रपट दाखवणे शक्य झाले तर माझ्या चित्रपटापासून ही मोहीम छत्रपती संभाजी नगर मध्ये चालू करू असे पत्रकारांशी बोलताना अभिनेते सुबोध भावे म्हणाले, ते स्वतः दिग्दर्शित केलेल्या संगीत मानापमान या चित्रपट प्रमोशनसाठी आले होते.

पुढे बोलताना भावे म्हणाले की, सध्या प्रेक्षक संख्येनुसार मराठी चित्रपटांना स्क्रीन उपलब्ध होत आहे .यामध्ये मराठी चित्रपट हे नोकरदार लोकांच्या कामाच्या वेळेमध्ये चित्रपट ग्राहक दाखवले जातात अशा वेळी प्रेक्षक संख्या कमी होते आणि चित्रपट दाखवण्यास चित्रपट ग्रहवाले नकार देतात या सर्व परिस्थितीवर तोडगा काढण्याच्या दिशेने पुणे येथे नाट्यगृहामध्ये चित्रपट दाखवणे अशी मोहीम चालू करण्यात आली आहे. नाटकांवर अन्याय होणार नाही म्हणून नाटक नसणाऱ्या वेळेत सिनेमा दाखवण्यात येत असून सध्या संगीत मानापमान या चित्रपटाचे बालगंधर्व या नाट्यगृहामध्ये ५शो चालू आहेत. सध्या १० जानेवारी पासून जिओ स्टुडिओ प्रस्तुत व सुबोध भावे दिग्दर्शित संगीत मानापमान हा चित्रपट महाराष्ट्रासह देशाबाहेरही प्रदर्शित होत आहे या चित्रपटाच्या प्रमोशन करिता सुबोध भावे हे छत्रपती संभाजीनगर मध्ये आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. चित्रपटात सूबोध भावे, सुमित राघवन, वैदेही परशुरामी, उपेंद्र लिमये, नीना कुलकर्णी, निवेदिता सराफ, शैलेश दातार, अर्चना निपाणकर आदी कलाकार प्रमुख भूमिकेत आहेत. बुद्धिमत्ता, स्वाभिमान आणि मनमोहक सौंदर्य यांच्या अलौकिक संगमाने चमकणारा तेजस्वी तारा म्हणजेच भामिनी चं पात्र अभिनेत्री वैदेहीने चित्रपटात सुरेखपणे साकारलय, वैदेहीची एक नवीन झलक आपल्याला पहायला मिळते. तसच कुटील, चाणाक्ष, धूर्त भावी सेनापती चंद्रविलास म्हणजेच सुमित राघवन ह्यांनी देखील आपली भूमिका चोख पार पाडली आहे. दिग्दर्शक आणि अभिनेते सुबोध भावे ह्यांचा क्शन अवतार सगळ्यांनाच भावला आहे.

# शहरात वाजतयं सायरन ! टवाळखोर,रोडरोमिओ, भुरट्या चोरांवर नजर

## नगरपालिका व पोलिसांच्या संकल्पनेतून शहरात सीसीटीव्ही कॅमेरे !

तभा वृत्तसेवा-सहयोग प्र.जावळे

कन्नड :- दि.१७ जानेवारी - शहरातील मुख्य रस्त्यांवर,वर्दळीच्या ठिकाणी,टवाळखोर, चोरटे, रोडरोमियोवर सीसीटीव्ही कॅमेरे नजर ठेवून आहेत,शहरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी नगरपालिकेच्या निधीतून शहरातील विविध ठिकाणी गर्दीच्या नऊ ठिकाणी बारा सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत हे कॅमेरे फिरते असल्याने एखादा व्यक्ती किंवा वाहन एकाच जाग्यावर दोनतीन वेळा कॅमेरात आला की लगेच सायरन वाजते यामुळे सगळेच सतर्क होत आहेत.

हे कॅमेरे बसस्थानक परिसरात दोन, अण्णा भाऊ साठे चौक एक , पिशोर नाका दोन , हिवरखेडा नाका एक, चाळीसगांव रोड शिवाजी महाविद्यालय कमान एक , जलशुद्धीकरण केंद्र दोन, शनी मंदिर एक , सिद्दीकी चौक एक , माळीवाडा एक असे नऊ ठिकाणी बारा कॅमेरे नजर ठेवून आहेत, या सर्व कॅमेरावर शहर पोलीस ठाण्याच्या नजरेत आहे.

यामुळे या परीसरातील हालचालीवर लक्ष ठेवता येणार आहे. शहरात कॅमेराची संकल्पना नगर परिषदचे मुख्याधिकारी नंदकिशोर भोंबे यांची व तत्कालीन पोलीस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांनी राबवली यासाठी नगर परिषदने स्वनिधीतून २ लाख २० हजार रुपये दिले आहेत सदरील कॅमेरे सोलर सह ऑडिओ व व्हिडीओ आवाज सह ३६० डिग्री मध्ये फिरते यामुळे चोरांवर, रोडरोमियो,ग टवाळखोरांवर वचक निर्माण झाला आहे.

शहरातील वर्दळीच्या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू नये,आणि तांत्रिक तपासाच्या अनुषंगाने सीसीटीव्ही फुटेज महत्वाचे असते,शहरातील सामाजिक संघटना,कॉलनी,सोसायटीतील नागरिकांनी आपल्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे त्यामुळे आपलाप परिसर सुरक्षित असेल
विजयकुमार ठाकुरवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी कन्नड

माळीवाडा बाजारपेठ,शनी मंदिर या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे असल्याने भुरट्या चोरांवर पोलिसांचे लक्ष असल्याने बाजारात चोऱ्यांचे प्रमाण कमी होईल
सुनील पवार, शहराध्यक्ष भाजपा

शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवल्याने रात्री बेरात्री येणाऱ्या नागरिकांना सुरक्षित वाटत आहे,विशेष म्हणजे बस स्थानक परिसर हा सुरक्षित झाला आहे
सिद्धार्थ निकाळजे
सामाजिक कार्यकर्ते



न.प.निधीतून बारा सीसीटीव्ही कॅमेरे शहरात लावण्यात आले यामुळे शहरात अस्वच्छता करणाऱ्यांवर सुद्धा नजर ठेवण्यासाठी मदत होते.अजूनही काही ठिकाणी बसवण्याचा उद्देश असुन आगामी काळात पूर्ण करणार आहे.
नंदकिशोर भोंबे
मुख्याधिकारी तथा प्रशासक
कन्नड नगरपालिका

हिवरखेडा नाका, पिशोर नाका, कॉलेज रोडवर खाजगी शिकवणी, महाविद्यालय असल्याने नेहमी विद्यार्थी विद्यार्थिनी या रस्त्याने ये-जा करत असतात सीसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे विद्यार्थ्यांची सुद्धा सुरक्षितता झाली आहे तसेच या परिसरातील नागरिकांची सुद्धा सुरक्षितता झाली आहे
युवराज बनकर
माजी नगरसेवक

शहरातील मुख्य रस्त्यावर सीसीटीव्ही कॅमेरे असल्याने वयोवृद्ध,महिला यांची सुरक्षितता होत आहे,बेभान वाहनचालकांना याचा चांगला जबर बसणार आहे,
संदेश पवार, युवक

---

संचिका क्र.२०२४/३. वि.अ.वै./एम.ए.जी./ज. मृ.नोंद/सी. आर ७० /२०२४
दिनांक :- १७/०१/२०२५.

## जाहीर प्रगटन

अर्जदार :- श्री/श्रीमती सुदाम मुरलीधर पवार रा. कनकोरी ता. गंगापूर जि छत्रपती संभाजीनगर

:-: विरुध्द :-:

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय कनकोरी ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११ (२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार यांचे वडील नामे मुरलीधर ऊर्फ म्हसु रंगनाथ पवार यांचा मृत्यु दिनांक ०२/०२/१९९० रोजी मौजे कनकोरी ता. गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय कनकोरी ता. गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला मृत्यु नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनूसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक १७/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
ठिकाण :- वैजापूर.
दिनांक :- १७/०१/२०२५
उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

---

संचिका क्रं.२०२४/३. वि.अ.वै./एम.ए.जी./ज. मु. नोंद/सी.आर ६९/२०२४
दिनांक :- १७/०१/२०२५.

## जाहीर प्रगटन

अर्जदार :- श्री/श्रीमती सुदाम मुरलीधर पवार रा. कनकोरी ता. गंगापूर जि छत्रपती संभाजीनगर

:: विरुध्द ::

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय कनकोरी ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११(२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार यांचे पंजोबा नामे आहेलाजी काशिबा पवार यांचा मृत्यु दिनांक ०२/०४/१९२१ रोजी मौजे कनकोरी ता. गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय कनकोरी ता. गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला मृत्यु नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनूसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक १७/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
ठिकाण :- वैजापूर.
दिनांक :- १७/०१/२०२५
उप विभागीय अधिकारी, वैजापूर

---

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. एन काटकर साहेब दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज नं. ३७४/२०२४ पुढील तारीख ३१/०१/२०२५

अर्जदार : १. हलीमाबी फारुक सय्यद, वयः ५९ वर्षे, धंदाः घरकाम, रा. रुईखेडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद, ह.मु. न्यु म्हाडा कॉलनी, रुम नं. ६०५, बिल्डींग नं. ९६, पी. एम. जी. पी. कॉलनी मनखूर्ड, शिवाजी नगर, मुंबई, जि. मुंबई. २. मुसा फारुक सय्यद, वयः ३७ वर्षे, धंदा : शेती, रा. रुईखेडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद, ह.मु. न्यु म्हाडा कॉलनी, रुम नं. ६०५, बिल्डींग नं. ९६, पी. एम. जी. पी. कॉलनी मनखूर्ड, शिवाजी नगर, मुंबई, जि. मुंबई. ३. फहीम फारुक सय्यद, वयः ३२ वर्षे, धंदाः शेती, रा. रुईखेडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद, ह.मु. न्यु म्हाडा कॉलनी, रुम .- ६०५, बिल्डींग नं. ९६, पी. एम. जी. पी. कॉलनी मनखूर्ड, शिवाजी नगर, मुंबई, जि. मुंबई. ४. फरीद फारुक सय्यद, वयः २४ वर्षे, धंदाः शेती, रा. रुईखेडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद, ह.मु. न्यु म्हाडा कॉलनी, रुम नं. ६०५, बिल्डींग नं. ९६, पी. एम. जी. पी. कॉलनी मनखूर्ड, शिवाजी नगर, मुंबई, जि. मुंबई. ५. हमीदा फारुक सय्यद, वयः २९ वर्षे, धंदाः घरकाम, रा. रुईखेडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद, ह.मु. न्यु म्हाडा कॉलनी, रुम नं. ६०५, बिल्डींग नं. ९६, पी.एम. जी. पी. कॉलनी मनखूर्ड, शिवाजी नगर, मुंबई, जि. मुंबई.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, व्दारा जिल्हा अधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज :- अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत फारुक अहेमद सय्यद यांचे कायदेशीर वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. डी. एफ. म्हस्के यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ५ हे वरील प्रमाणे कायमचे रहिवासी आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील नामे फारुक अहेमद सय्यद यांना अर्जदार क्र. १ ते ५ वैतिरीक्त कोणीही वारस नाहीत. अर्जदार क्र. १ ही मयत फारुक अहेमद सय्यद यांची पत्नी असुन अर्जदार क्र. २ ते ४ मुले व अर्जदार क्र. ५ हि मयताची मुलगी आहे. अर्जदार क्र. १ यांचे पती तसेच अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील हे दि. ०७/०१/२०२२ रोजी मयत झालेले आहे. तसेच त्यांचा अंत्यसंस्कार हा मुंबई येथे करण्यात आलेला आहे. मयत फारुक अहेमद सय्यद यांना अर्जदारांशिवाय कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत फारुक अहेमद सय्यद यांना मिळणारा शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे तसेच संबंधीत तलाठी यांनी मयताच्या नावे असलेल्या स्थावर तसेच जंगम मिळकतीमध्ये वारसाची नोंद घेण्यासाठी मा. न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र आनायचे सांगीतले, त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कारण घडले. अर्जदार यांनी सदर अर्जाव्यतिरीक्त इतर कोणत्याही मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :-१७/०१/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड.

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २९/२०२५.

अर्जदार :१. नामदेव किसन वाघ, वय ६० वर्षे, धंदा शेती, रा. जरंडी, ता. सोयगांव, जि. छ.संभाजीनगर २. तुकाराम किसन वाघ, वय ५५ वर्षे, धंदा व रा. वरीलप्रमाणे. ३. सुनंदा भगवान गव्हाणे, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. खुर्ची खु, ता. एरंडोल, जि. जळगांव, ४. सिताराम किसन वाघ (मयत) तर्फे वारसदारः- अ) मिराबाई सिताराम वाघ, वय ५० वर्ष, धंदा शेती, रा. जरंडी, ता.सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. ब) निंबाजी सिताराम वाघ, वय ३६ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. क) संतोष सिताराम वाघ, वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा. जरंडी, ता.सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. ड) आशा नंदु लांडगे, वय ३६ वर्षे, धंदा शेती, रा. नेरी बु., ता. जामनेर, जि. जळगांव.

विरुध्द

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर स्यगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत बहीणाबाई किसन वाघ यांचा दिनांक २३/०७/२०१९ रोजी जरंडी, ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ४ (अ ते ड) वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ हे मयत बहीणाबाई किसन वाघ यांचे वारस असुन त्यांना शासकिय/ निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १६/०१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. २७/०२/२०२५

आदेशावरुन

विभीगीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक
(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

---

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख : २६/०२/२०२५
दि.कि.अर्ज क्र. ०१/२०२५

अर्जदार : १. अलका अनिल जाईबहार, वयः ५३ वर्षे, धंदाः घरकाम, रा. पवार गल्ली, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. अमित अनिल जाईबहार, वयः २७ वर्षे, धंदाः शिक्षण, रा. पवार गल्ली, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. अनुजा अजय काळे, वयः ३० वर्षे, धंदाः घरकाम, रा. वेअर पूर्वरंग सोसायटी, वाघोली, ता. जि. पुणे. ४. साहेबराव मुरलीधर जाईबहार, वयः ८३ वर्षे, धंदाः काही नाही, रा. शितलमाता गल्ली, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद.

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. एच. जी. शेख यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील व अर्जदार क्र. ४ यांचा मुलगा नामे अनिल साहेबराव जाईबहार हे दि. ११/०९/२०२४ रोजी मौजे कन्नड, ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत अनिल साहेबराव जाईबहार यांना अर्जदार क्र. १ ते ४ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. ०१/०१/२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड.

---

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील दिवाणी न्यायाधीश साहेब, कनिष्ठ स्तर, कन्नड यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १९/२०२५
पुढील तारीख २८/०२/२०२५

अर्जदार : १. इद्रीसबेग पिता उस्मानबेग मोगल, वय ५७ वर्षे, धंदा व्यापार, रा. चिकलठाण, कत्रड, ता. कब्रड जि. औरंगाबाद. ह.मु. बरडी मजीद परिसर, मुस्तफा पार्क, वैजापुर ता. वैजापुर जि. औरंगाबाद. २. शरीफबेग पिता उस्मानबेग मोगल, वय ५० वर्षे, धंदा मजुरी, रा. चिकलठाण, कब्रड, ता. काड जि. औरंगाबाद. ३. आरिफबेग पिता उस्मानबेग मोगल, वय ४८ वर्षे, धंदा मजुरी, रा. चिकलठाण, कन्नड, ता. कब्रड जि. औरंगाबाद. ४. नाजीमबेग पिता उस्मानबेग मोगल, वय ३८ वर्षे, धंदा मजुरी, रा. चिकलठाण, कब्रड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. अजिमबेग पिता उस्मानबेग मोगल, वय ३५ वर्षे, धंदा मजुरी, रा. चिकलठाण, कत्रड, ता. कब्रड जि. औरंगाबाद. ६. जमीलाबानो भ्र. अजहर खान, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. गया ईस्लामपुरा, मालेगांव ता. मालेगांव जि. नाशिक. ७. समिनाबानो भ्र. शकील अहमद, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. घरकाम, रा. खोली नं. १२, गल्ली नं. ५, पक्की खोली, आयेशा नगर, मालेगांव ता. मालेगांव जि. नाशिक. ८. सगीरा भ्र. मुख्तार पटेल, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा. जवलकी पोस्ट बोलठाण, ता. नांदगांव जि. नाशिक.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. व्ही. के. मोहिते यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क. १ ते ५ हे मयत उस्मानबेग कासमबेग मोगल व मयत जाहिदाबी भ्र. उस्मानबेग मोगल यांचे मुले असून अर्जदार क्र. ६ ते ८ ह्या मयताच्या विवाहित मुली आहेत. अर्जदार के. १ ते ८ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार कं. १ ते ८ हे मयत उस्मानबेग कासमबेग मोगल व मयत जाहिदाबी भ्र. उस्मानबेग मोगल यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदाराचे वडील उस्मानबेग कासम बेग हे दिनांक ०६/०२/२०२४ रोजी नौजे चिकलठाण येथे वृद्धपकाळाने मरण पावले असून अर्जदारांची आई नामे जाहिदाबी भ्र. उस्मानबेग मोगल ही दि.०२/०३/२०२३ रोजी मौजे कत्रड येथे वृद्धपकाळामुळे मरण पावली आहे व अर्जदार यांचे वडील अब्दुल समद ताहेर महम्मद हे दि.०९/०५/२०२३ रोजी मौजे चिकलठाण ता. कन्नड येथे मयत झाली आहे. अर्जदार के. १ ते ८ यांना मयत उस्मानबेग कासमबेग मोगल व मयत जाहिदाबी अ. उस्मानबेग मोगल यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार कं. १ ते ८ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्रं. १ ते ८ हे व त्यांचे वडील उस्मानबेग कासमबेग मोगल व त्यांची मयत आई नामे मयत जाहिदाबी भ्र. उस्मानबेग मोगल हे मौजे चिकलठाण ता. कन्नड येथील मुळचे रहिवाशी होते. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ८ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.०१/१०/२०२४ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १६/०१/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड.

## अग्रलेख...

# सूर्य आणि जयद्रथ

केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे, तर देशाच्याच एकूण राजकारणाची पातळी विरोधकांनी आपल्या स्वार्थी सत्तालालसेपोटी किती खालच्या स्तरावर नेऊन ठेवली आहे आणि त्याहूनही खालची पातळी शोधण्याची स्पर्धाही चालविली आहे हे गेल्या काही दिवसांतील विरोधकांच्या तंबूत सुरू असलेल्या मुक्ताफळांच्या मुक्त उधळणीवरून देशाला दिसू लागले आहे. भाजपाला सत्तेपासून दूर राखणे आणि काहीही करून सत्ता संपादन करणे एवढा एकमात्र संकुचित हेतू ठेवून एकत्र आलेल्या इंडिया आघाडीची गाजराची पुंगी तेव्हाही वाजली नव्हतीच, आता तर ती मोडून खाण्याची वेळ आल्यावर त्यासाठी देखील कोणाचीच तयारी नसल्याचे स्पष्ट झाले असून, इंडिया नावाने स्थापन केलेल्या आघाडीतील पक्ष ज्याप्रमाणे स्वतंत्र अस्तित्वाची चर्चा करू लागले आहेत, ते पाहता भविष्यात काँग्रेस एकाकी पडणार आणि काँग्रेसच्या कुबड्या घेऊन आपले अस्तित्व टिकविण्याची धडपड करणाऱ्या परावलंबी पक्षांचे कंबरडे मोडणार हे स्पष्ट होऊ लागले आहे. कोणे एके काळी, म्हणजे अगदी लोकसभा निवडणुकांच्या दरम्यान महाराष्ट्रातील काँग्रेसी परंपरेतील नेते शरद पवार यांना काँग्रेसच्या उज्ज्वल भवितव्याची स्वप्ने पडू लागली होती. निवडणुकांनंतर लहानमोठे पक्ष किंवा प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील किंवा काँग्रेसच्या आघाडीत सामील होतील असे भाकीत त्यांनी वर्तविले होते. पण अलिकडे पवारांच्या भाकितांचीच नव्हे तर एकूणच राजकीय मानसिकतेचीच चिकित्सा होऊ लागल्याने, त्या विधानाची तात्पुरती चर्चा झाल्यानंतर त्याकडे कोणी फारसे ढुंकूनही पाहिले नव्हते. आपल्या राजकारणाची सद्दी आता संपत चालली असून आपल्या पक्षालाच कोणाच्या तरी वळचणीचा आधार शोधावा लागेल हे पवार यांना स्पष्ट दिसू लागले असावे. अन्यथा, ऊठसूठ महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीची उदाहरणे देत सभ्यपणाचे धडे शिकविणाऱ्या पवार यांनी काही अनाठायी वक्तव्यांसाठी जीभ टाळ्याला लावण्याचे भलते धाडस केले नसते. आपल्या वक्तव्याचा विपर्यास केला असे म्हणण्याची सोय अलिकडे राजकीय नेत्यांना राहिलेली नाही. पूर्वी जेव्हा प्रसार माध्यमांच्या हातात कॅमेरे वगैरे नव्हते आणि केवळ मुद्रित माध्यमांचाच प्रभाव होता, तेव्हा राजकीय नेते या युक्तिवादाचा बचावात्मक फायदा उठवत असत. आता कॅमेऱ्यासमोरील बोलण्याचे पुरावे कोठेही आणि केव्हाही उपलब्ध होत असल्याने, एकदा टाळ्याला लावलेल्या जिभा मागे वळविता येत नाहीत. पवार यांनाही कधीकधी वक्तव्याचा विपर्यास केल्याचा बचाव करण्याची वेळ येत असे, पण आता ती संधी राहिलेली नसल्याने, सूर्य आणि जयद्रथ दाखविता येतात, हे माहीत असूनही पवार यांनी परवा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याविषयी अशोभनीय विधान करून पुन्हा एकदा आपली वैचारिक पातळी दाखवून दिली.

महाराष्ट्रातील भाजपाच्या महाविजय मेळाव्यात बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शरद पवार आणि ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे यांच्यावर खरपूस टीका करत त्यांच्या राजकारणाचा समाचार घेतला. शरद पवार यांनी १९७८ पासून दगाफटक्याची राजनीती केली, तर उद्धव ठाकरे यांनी पित्याच्या विचारास मूठमाती देत खोटारडेपणाने मुख्यमंत्रिपद पटकावले अशा शब्दांत शाह यांनी केलेली टीका पवार यांना झोंबणे साहजिक होते, पण या आरोपातून स्वतःचा बचाव करण्यासाठी शाह यांच्यावरील कारवाईचा अनाठायी उल्लेख करून आता त्यांनी आपल्या संपूर्ण कारकीर्दीचा पंचनामा करण्याचे हत्यारच भाजपाच्या हाती दिले आहे. १९७८ पासूनच्या उल्लेखाचे शाह यांचे संदर्भ तपासले, तर पवार यांच्या दगाफटक्याच्या राजनीतीच्या अनेक नोंदी महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात चर्चिल्या जातात. उद्धव ठाकरे यांनी भाजपासोबत युती करून विधानसभेच्या निवडणुकीत मिळविलेल्या जनाधाराचा गैरफायदा घेत जनतेने नाकारलेल्या पक्षांसोबत नंतर महाविकास आघाडीची मोट बांधली व मुख्यमंत्रिपद मिळविले हा ताजा इतिहास आहे. तो नाकारणे स्वतः ठाकरे यांच्यासाठी फारसे सोपे नाही. शरद पवार यांनी संपादन केलेल्या पहिल्या मुख्यमंत्रिपदाचा इतिहासही ठाकरे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कहाणीशी मिळताजुळता आहे. १९७७ मध्ये इंदिरा काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन शरद पवार यांनी रेड्डी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. १९७८ मधील विधानसभा निवडणुकीत इंदिरा काँग्रेस आणि रेड्डी काँग्रेस (काँग्रेस-यू) स्वतंत्रपणे लढल्या होत्या. त्या निवडणुकीत जनता पक्ष हा सर्वांत मोठा पक्ष ठरला, पण बहुमतासाठी त्यांना जागा कमी पडल्याने, इंदिरा काँग्रेस व रेड्डी काँग्रेसने एकत्र येऊन वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले. पुढे अंतर्गत मतभेद वाढत गेले आणि अवघ्या सुमारे साडेचार महिन्यांत शरद पवार यांनी ४० आमदारांसह बंडखोरी करून सरकार पाडले व पुलोदची स्थापना करून जनता पक्षासोबत सरकार स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला. शरद पवार हे महाराष्ट्राचे पहिले सर्वांत तरुण मुख्यमंत्री बनले, पण वसंतदादांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे राजकारण अशीच त्यांच्या या राजकारणाची नोंद महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात झालेली आहे. त्यांचे हे सरकार अल्पजीवीच ठरले आणि पवार यांच्यावर दीर्घकाळ सत्तेबाहेर राहण्याची वेळ आल्याने त्यांनी पुन्हा काँग्रेसच्या वळचणीस जाण्याच्या हालचाली सुरू केल्या. पुढील इतिहासातही पवार यांच्या राजकारणावर सातत्याने अनाकलनीयतेचेच शिक्के मारले जात होते, हे महाराष्ट्राने अनुभवले आहे. बहुधा त्यामुळेच, चार वेळा मुख्यमंत्रिपद मिळवूनही स्वबळावर सरकार स्थापन करणे दूरच, पण एकदाही त्यांचे सरकार पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करू शकले नाही. इतरांना बेसावध ठेवून सत्तेचे राजकारण करणारा बेभरवशी नेता अशी त्यांची प्रतिमा आजही महाराष्ट्रात कायमच असल्याने शाह यांनी पवार यांच्यावर केलेल्या दगाफटक्याच्या राजकारणामुळे महाराष्ट्रात फारसे वादळ माजले नाही.

मुळात, अमित शाह यांच्यावरील तडीपारीच्या आदेशामागील वास्तव एव्हाना पुरेसे स्पष्ट झाले असून, तरीही पवार यांच्यासारख्या नेत्याने त्याचा उल्लेख करण्यामागे स्वतःच्या बचावाबरोबरच जनतेची नव्याने दिशाभूल करण्याच्या प्रयत्नांव्यतिरिक्त अन्य काही हेतू असेल असे दिसत नाही. अमित शाह यांना ज्या प्रकरणात आदेश बजावण्यात आला होता, ते प्रकरण एका देशद्रोही कुख्यात स्मगलरच्या एन्काऊंटर प्रकरणातील होते आणि त्या कारवाईच्या विरोधात एकवटलेल्यांच्या फळीतही, भाजपाविरोधाचाच विखार होता. अन्यथा, भाजपाला विरोध करताना आपण एका देशद्रोह्याचे समर्थन करत असून त्याच्यावरील कारवाईस विरोध करत आहोत, याचे भान विरोधकांनी राखले असते. २०१९ मधील महाविकास आघाडीची स्थापना, उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाचे गाजर दाखवून भाजपासोबतच्या युतीमधून बाहेर काढणे व जनतेने नाकारलेल्या पक्षांची मोट बांधून सरकार स्थापन करणे हा दगाफटक्याच्या राजकारणाचाच नमुना मानला जातो. महाराष्ट्रातील पवार यांच्या पहिल्या मुख्यमंत्रिपदापासून २०१९ मधील महाविकास आघाडीच्या स्थापनेपर्यंतच्या राजकीय कारवायांचा इतिहास अशाच राजकारणाने रंगलेला दिसतो. १९९३ मधील बॉम्बस्फोटांनंतर स्फोटांच्या संख्येत अकारण वाढ करून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न असो किंवा कुख्यात स्मगलर दाऊदचे साथीदार असल्याचा आरोप असलेल्यांना सोबत घेऊन प्रवास करणे असो, पवार यांच्या त्या त्या वेळच्या प्रत्येक राजकरणाभोवती संशयाचे वादळ घोंघावत राहिले होते. भारतात शरण येऊन स्वाधीन करण्याची तयारी दाऊद इब्राहिमने दाखविली होती, पण पवार यांनी त्यास नकार दिला, असा एक गौप्यस्फोट कायदेतज्ज्ञ राम जेठमलानी यांनी केला होता. ज्याच्या कारवायांनी उभा देश कित्येक वर्षे त्रस्त राहिला, असा खतरनाक दहशतवादी स्वाधीन होण्यास तयार असतानाही पवार यांनी त्याच्या शरणागतीस नकार देऊन त्याचे समर्थनही केले होते, हे देशाने पाहिले आहे. त्यामुळे अमित शाह यांनी पवार यांच्यावर केलेल्या दगाफटक्याच्या राजकारणाचा आरोप महाराष्ट्रास तरी नवा नाही. आता शाह यांनी केलेल्या आरोपातून आपला बचाव करण्यासाठी पवार यांनी शाह यांच्यावर केलेल्या आरोपामुळे होणाऱ्या प्रतिहल्ल्यांतून दगाबाजीच्या राजकारणाचे दाखले समोर येऊ लागतील, तेव्हा पवार यांची पाठराखण करण्यासाठी पुढे येणाऱ्या पाठीराख्यांच्या इतिहासाचीही उजळणी होऊन महाराष्ट्राचे नवे मनोरंजन सुरू होईल यात शंका नाही.

## दखल

# राम मंदिर : राष्ट्रजीवनाला कलाटणी देणारा विषय

**प्रणय पराते**

अयोध्येत प्रभू श्रीरामचंद्रांच्या प्राणप्रतिष्ठेला तिथीनुसार नुकतेच एक वर्ष पूर्ण झाले. त्या पृष्ठभूमीवर मंदिर आंदोलनाचा थोडक्यात आढावा घेणे औचित्यपूर्ण ठरेल. अयोध्येतील श्रीराम जन्मभूमीवर मंदिर उभे करण्याचे आंदोलन दीर्घ काळ चालले. या काळात अनेक वेळा काही बुद्धिभ्रम करणारी मंडळी किंवा या विषयाचा गाभा आणि तीव्रता याचा गंधही नसलेली मंडळी अगदी सहजपणे, 'इतकी मंदिरे असताना आणि त्यांचीच व्यवस्था आपल्याला ठेवता येत नसताना आणखी एका मंदिराची काय गरज?' 'देशात बेरोजगारी, भाकरी असे जीवन-मरणाचे प्रश्न असताना मंदिरासाठी इतका आटापिटा करण्याची काय गरज?' 'केवळ राजकारणासाठी हा विषय पेटवला जात आहे.' अशा प्रकारची सवंग विधाने करत होती. मात्र, याच आंदोलनाच्या काळात घडलेले देशातील सामाजिक, वैचारिक, सांस्कृतिक परिवर्तन पाहिले की लक्षात येते, श्रीराम जन्मभूमी आंदोलनाने देशाच्या स्वभावात, मान्यतांमध्ये आमूलाग्र परिवर्तन केले आहे. इंग्रजांकडून स्वराज्य मिळाल्यानंतर डोळे झाकून केवळ पाश्चात्त्यांची नक्कल करणारा देश आता आपल्या स्वत:च्या तंत्राने विचार करू लागला आहे. नव्हे, त्याच्या पुढे जाऊन जगाला मार्गदर्शन करण्याची आपली क्षमता जगाला दाखवून देण्याच्या स्थितीत देश येऊन पोहोचला आहे. देशाला कलाटणी देणारा विषय म्हणून व्यापक दृष्टिकोनातून या विषयाकडे पाहिले पाहिजे. 'करवट बदल रहा है देखो भारत का इतिहास' असे एक गीत आहे. भारताच्या इतिहासाने कसे वळण घेतले, याचा अनुभव श्रीराम जन्मभूमी आंदोलन ज्यांनी जवळून पाहिले आहे, त्यांना नक्कीच आला आहे.

यातील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे तो राष्ट्रवादाचा. राष्ट्र ही संकल्पना केवळ भूभागातील सीमांनी किंवा त्या भूभागावर कोण राज्य किंवा शासन करत आहे, यावर अवलंबून नसते. एका जनसमूहाला भावनिकरीत्या आणि जीवनरचनेच्या आधारावर एकत्र बांधून ठेवणारी शक्ती म्हणजे राष्ट्र असते. थोडक्यात समान जीवनमूल्ये आणि समान जीवनश्रद्धा यामधून समूहाच्या मनात एकतेची, एकत्र बांधिलकीची भावना तयार होते ती राष्ट्र असते. 'होय, मी केशव बळीराम हेडगेवार म्हणतो की, हे हिंदुराष्ट्र आहे' असे डॉ. हेडगेवार म्हणाले होते. मात्र, तेव्हापासून संघ स्वयंसेवक किंवा अन्य कोणीही असा दावा केला की, टीका करणारे, भ्रम निर्माण करणारे लगेच 'मग या देशातील अहिंदूंचे काय? लाखो मुस्लिम, ख्रिश्चन यांना देशाबाहेर हाकलून लावणार काय?' असे प्रश्न विचारत होते. मुळात हिंदू हे कोण्या एका प्रार्थना पद्धतीचे नाव नाही. मात्र, खुबीने त्याची तुलना मुस्लिम, ख्रिश्चन या प्रार्थना पद्धती निदर्शक समुदाय वाचक नावाशी केली जात होती. प्रार्थना पद्धतीशी हिंदुत्व किंवा हिंदू राष्ट्र ही संकल्पना निगडित नाही हे समाजाला, जगाला पटवून देण्यासाठी एका मंदिराचे आंदोलन उपयोगी ठरले, हे या विषयातील एक मर्म आहे. याचे कारण, जी राष्ट्रभावना या देशातील जनतेच्या मनात प्राचीन काळापासून रुजली आहे ती 'श्रीराम' या व्यक्तिमत्त्वाशी, नावाशी जोडलेली आहे. एकही शब्द न समजणाऱ्या विविध भाषा या देशात बोलल्या जातात. खाण्यापिण्याच्या, परिधान करण्याच्या कितीतरी भिन्न पद्धती देशभर आहेत. मात्र या सर्व भागात देशात श्रीराम, श्रीकृष्ण, शिव, गंगामाता, गोमाता, ओम अशा प्रतीकांबद्दल समान श्रद्धाभाव आहे. आदर्श जीवन पद्धतीत तर जी समानता आहे ती रामचरित्राशी जोडली आहे. आदर्श मुलगा कसा असावा तर वडिलांचे वचन पूर्ण करण्यासाठी सिंहासनाच्या पायऱ्या चढत असताना त्या उतरून वनवासाला जाणारा इतका आज्ञाधारक असावा, भा□□ऊ कसा असावा तर मोठा भाऊ वनवासाला गेला असताना त्याच्या पादुका सिंहासनावर ठेवून निरपेक्ष भावनेने राज्य सांभाळणारा असा भरतासारखा असावा. हे सगळे केवळ एका आदर्श गोष्टीतील बोध किंवा मुद्दे नाहीत तर भारतीय समाजजीवनात सहजपणे स्वीकारलेल्या मान्यता आहेत. त्यामुळे श्रीराम जन्मभूमीचा विषय विविध भाषा, प्रांत या सर्व भेदांना ओलांडून सर्वसामान्यांच्या मनाला स्पर्शून गेला. राम जन्मभूमीवर मंदिर उभे करण्यासाठी संपूर्ण देशभरातून लोक अयोध्येच्या दिशेने अनेक संकटांवर मात करत निघालेले जगाने पाहिले. प्रत्येकाला कल्पना नसलेली मनाच्या कोपऱ्यात, हृदयाच्या स्पंदनात दडलेली ही जीवनरचनेची समानता जी राष्ट्र या भावनेचा पाया आहे ती राम जन्मभूमी मंदिर आंदोलनाने सहजपणे प्रकट झाली. आपला राष्ट्रवाद कोणता, येथील जनमानसात कोणता समान भाव वसलेला आहे याचा शब्दात नव्हे, तर प्रत्यक्ष अनुभव या आंदोलनात आला. श्रीराम शिलापूजन, श्रीराम ज्योतयात्रा, कारसेवा अशा अनेक अभियानात सर्वसामान्य माणसाला रामसेवेत काही करण्याची संधी होती. सगळा देश सर्व भेद अगदी सहजपणे विसरून मनात, समाजात वसलेल्या राम नावाच्या व्यक्ती नव्हे, प्रवृत्तीसाठी काम करायला उभा राहिला. त्याचा राष्ट्रवाद जागा झाला. आत्मस्वरूपाची जाणीव झाली, हे या आंदोलनाचे यश आहे. या आंदोलनामागचा हेतू एका पूजा पद्धतीतील एक देवाचे मंदिर उभे करणे हा नाही, हे जसे जसे स्पष्ट होत जाईल तसे तसे मुस्लिम, ख्रिश्चन या पूजा पद्धतीतील अनुयायीसुद्धा या विषयात मोकळेपणाने समर्थन देत उभे राहतील हे भविष्यात दिसेलच.

या देशातील विविधतेतही सखोल सांस्कृतिक एकता दडलेली आहे, असे वाक्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते. मात्र राम जन्मभूमी मंदिराचे आंदोलन सुरू झाले तेव्हा देशातील परिस्थिती याच्या अगदी विरुद्ध होती. जातीतील तेढ, मठ-मंदिरातील श्रेष्ठत्वाचे दावे, वाद, संकुचित अस्मितांचे संघर्ष पाहिले की सखोल सांस्कृतिक एकतेची कल्पना विरुद्ध टोकाची वाटत होती. मठ, धर्माचार्य, पंथ यांच्यातील वाद, अहंकार शिखरावर पोहोचलेले पाहिले की, यांच्यातल्या एकतेची कल्पना ही काल्पनिक वाटत होती. मात्र, श्रीराम जन्मभूमी आंदोलनात कानाकोपऱ्यातील मठ, आश्रम, महाराज, धर्माचार्य हे आपापले अहंकार, मोठेपणाच्या कल्पना बाजूला ठेवून जेव्हा 'जय श्रीराम' अशी एकच घोषणा देत उतरले तेव्हा त्यांचा अनुयायीवर्गही हे आपलेच काम आहे, असे मनाशी ठरवून नि:संकोचपणे झोकून देत उतरला तेव्हा बाबासाहेब आंबेडकरानी वर्णन केलेल्या सखोल सांस्कृतिक एकतेचे प्रकटीकरण झाले, असे वाटले. ही देशाच्या समाजजीवनाला कलाटणी देणारी प्रक्रिया होती ती या आंदोलनाने साध्य झाली.

समाजात चुकीच्या मान्यता प्रस्थापित करत त्या आधारे आपले राजकीय स्वार्थ साधून घेण्याची एक पद्धत या देशात स्वराज्यानंतर धुरिणांनी रूढ केली होती. उदाहरण म्हणून सर्वधर्मसमभाव हा विषय घेता येईल. समभाव किंवा धर्मनिरपेक्षता यातील निरपेक्षता या शब्दांचा जो अर्थ आहे, त्याच्या नेमके उलट वागणे म्हणजे धर्मनिरपेक्षता किंवा सर्वधर्मसमभाव अशी मान्यता तयार करण्यात आली होती. तोंडाने सर्वधर्मसमभाव म्हणायचे; प्रत्यक्षात शहाबानो यांना पोटगी देण्याची वेळ आली की शरियतला मान्य नाही, असे म्हणत घटनादुरुस्ती करून न्यायालयाने दिलेला निकाल बदलावा लागेल इतका भेदभाव प्रकट करायचा. प्रशासन धर्मनिरपेक्ष असे तत्त्व तोंडाने सांगायचे, मात्र नागरी कायदा सर्वांना सारखा करा म्हटले की, कल्पनेतही ते शक्य नाही, असे भाव प्रकट करायचे. या विषयाला पंथाचा, पंथ अस्मितेचा रंग देत सवंग आणि मतांचा ग□ठ्ठा काबीज करण्याचे डावपेच खेळायचे. श्रीराम जन्मभूमी मंदिर आंदोलन आणि शहाबानो प्रकरण हे एकाच काळात आलेले दोन विषय आणि त्यावेळी राजकारण्यांचा व्यवहार यातून जनतेसमोर सगळी ढोंगबाजी उघड झाली. देशात राजकीय परिवर्तन घडण्याची प्रक्रिया श्रीराम जन्मभूमी आंदोलनामुळे गतिमान झाली, यात काही दुमत असण्याचे कारण नाही.

९८२३१९०१७४

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# साहेब व्हीसीत आहेत जनतेच्या कामाचे काय?

आपण कोरोनात महामारी बघितली. त्या काळातील स्थित्यंतरे भविष्यातही अनुभवावी लागणार आहेत. कोरोनातील कमी लोकांमध्ये लग्न वगैरे चांगल्या गोष्टी भविष्यातही सुरू राहायला हव्या, असे त्यावेळी वाटत होते. पण, तसे होऊच शकले नाही. फक्त लग्न कार्याचा विचार केला तर कोरोना काळापेक्षा जास्त सुसाट खर्च आताच्या काळात होऊ लागला आहे. त्यावेळी सरकारनेच विवाह कार्यावर लगाम कसली होती. आता रेल्वेचे थांबे आणि केंद्र सरकारच्या रेल्वेतील सुविधा सोडल्या तर सर्व काही रुळावर आलेले आहे. कोरोनाने घरेची घरे उद्ध्वस्त केली. त्या काळाची आठवणीही नकोशी होते. वैद्यकीय क्षेत्र आणि पोलिसांनी जीवाच्या पलीकडे कामे केली. केंद्र सरकारच्या निर्देशावर सरकारी यंत्रणेनेही त्या काळाला साजेसे असेच काम केले. महाराष्ट्राचे तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस राज्य पिंजून काढत होते आणि मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे आभासी होते. त्या काळाने दोन गोष्टी प्रामुख्याने दिल्या. त्या कोणासाठी चांगल्या तर कोणासाठी वाईटही असू शकतात. त्यातील एक म्हणजे खाजगी कंपन्यांमध्ये 'वर्क फ्रॉम होम' आणि दुसरी म्हणजे शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी 'व्हिडीओ कॉन्फरन्स!' कोरोना काळात ज्यांना साधारणतः आयटी क्षेत्राशी संबंधित असलेल्या नोकऱ्या लागल्या, त्यातील अनेक कर्मचाऱ्यांनी स्वत:चे कार्यालयही बघितले नाही. आपल्याला ज्यांनी कामावर ठेवले, आपल्याला प्रतिष्ठा मिळवून दिली, जे आपल्याला वेतन देते त्या कार्यालयाची पायरीच आपल्याला माहिती नसणे, ही बाब चांगली की वाईट, हे कोंबडी आधी की अंडे या प्रश्नासारखे होईल. वर्क फ्रॉम होम काही लोकांसाठी प्रतिष्ठेचे झाले. खाजगी कंपन्यांची वेतन दिले की काम संपले, डोकेदुखी कमी झालेली आहे. भारतातून विदेशात गेलेले अनेक जण कोरोनाच्या महामारीत मायदेशात परत आले आणि वर्क फ्रॉम होम घेऊन घरबसल्या काम करीत आहेत. वर्क फ्रॉम होम हा संबंध थेट खाजगी कंपनी आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांसोबत असल्याने त्याचा सामान्य नागरिकांवर तसा परिणाम होत नाही. परंतु, दुसरा जो शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी असलेला व्हिडीओ कॉन्फरन्स हा विषय डोकेदुखी ठरतो आहे. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना उघडपणे बोलता येत नाही. परंतु, सामान्य नागरिकांच्या कामावर त्याचा परिणाम होताना दिसून येतो. आठवड्यातील तीन दिवस दोन ते चार तास अधिकारी व्हिडीओ कॉन्फरन्समध्ये अडकून असतात. गावखेड्यातून शासकीय कार्यालयात भेटायला आलेल्याला बहुतांश वेळा 'साहेब' व्हीसीत आहेत, असाच निरोप दिला जातो. कोरोना काळात दिवसातून चार ते पाच तास व्हीसी. त्यानंतर व्हीसीत मुंबई, दिल्लीतील अधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचना आपल्या खालच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचविणे आणि त्याची अंमलबजावणी करून त्याचे उत्तर देण्यात अधिकाऱ्यांचा वेळ निघून जात होता. आजही वेगवेगळ्या विभागांच्या दिवसातून सरासरी दोन तास व्हीसी झाल्याशिवाय राहत नाही. पूर्वी एका मीटिंगसाठी नागपूर-मुंबईला अधिकाऱ्यांना जावे लागत होते. आता व्हीसीच्या माध्यमातून वेळ आणि पैसा दोन्ही वाचत असले, तरी साहेब कार्यालयात राहून गरजूंना भेटू शकत नाहीत, हेही वास्तव आहे. 'व्हीसी' या शब्द जन्माला येण्यापूर्वी बाहेर बैठकीला जाणारे जिल्हाधिकारी वा तत्सम अधिकारी 'चार्ज' देऊन जात होते. आता चार्जही दिला जात नाही आणि व्हीसीच्या जोखडात अडकल्याने कामंही निघत नाहीत. व्हिडीओ कॉन्फरन्स आधुनिक युगातील एक महत्त्वाचं संवाद साधन असले, तरी त्याच्या काही मर्यादा आहेत. यात सर्वांत महत्त्वाचे म्हणजे माणसं भेटणे हा सामाजिक विषयच बंद झाला. प्रत्यक्ष बैठकीत होणारा संवाद कमी झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यापासून प्रत्येक दिवसाला नवीन काही तरी चांगले होताना प्रत्यक्ष दिसून येत आहे. दोन दिवसांपूर्वी त्यांनी मंत्र्यांच्या बंगल्यावर होणाऱ्या अवाजवी खर्चावर लगाम लावण्याचा निर्देश दिला. त्यापूर्वी अधिकाऱ्यांना विकासाचा १०० दिवसांचा प्लॅन करायला लावला. मंत्र्यांना तीन दिवस मंत्रालयात राहण्याच्या सूचना केल्या. नव्या सरकारमध्ये खाजगी सचिव किंवा विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून खाजगी व्यक्तीच्या नियुक्तीला मनाई करण्यात आली आहे. राज्यातील महानगर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न झाल्याने लोकप्रतिनिधीच नाहीत. राज्य सरकार राज्याच्या विकासासाठी १०० दिवसांचा आराखडा तयार करीत असताना अधिकारी-कर्मचारी व्हीसीत अडकून राहतील तर १०० दिवसांच्या कामांचे काय होईल? आधीच सरकारी अधिकारी, कर्मचाऱ्यांना कामाचा उत्साह! उशिरा येणे आणि वेळेच्या पूर्वी कार्यालय सोडण्याची हातोटी असल्याने सामान्य नागरिकांना अजूनही शासकीय कामांविषयी विश्वास नाही. तो मिळविण्यासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर सरकारचा वचकही आवश्यक आहे.

९८८१९०३७६५


## प्रासंगिक

# एक कराड अडकला, इतर 'कराडां'चे काय?

**मोरेश्वर बडगे**

महाराष्ट्राचे राजकारण एकंदरीत कोणत्या दिशेने चालले आहे, याची साक्ष देणाऱ्या घटना अलिकडे वाढल्या आहेत. आपण महाराष्ट्रात आहोत की बिहारमध्ये असा प्रश्न पडावा, अशा या घटना आहेत. बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबरला हत्या झाली. त्यावरून गेले महिनाभर राजकारण तापले आहे. एका लोकप्रिय सरपंचाची अतिशय निर्घृणपणे हत्या होते आणि ज्या निर्ढावलेपणाने यातील आरोपी पोलिसांना सापडत नाहीत, त्यांचे आश्रयदाते मोकाट हिंडतात. शेवटी यातला सूत्रधारच 'शरण' येऊन पोलिसांचे टेन्शन दूर करतो, हा प्रकार महाराष्ट्राची मान खाली घालवणारा आहे. प्रश्न मृत सरपंचाच्या कुटुंबीयांना न्याय मिळतो की हा तर आहेच; पण स्कॉटलंड यार्ड पोलिसांच्या तोडीच्या मानल्या जाणाऱ्या महाराष्ट्र पोलिसांच्या इज्जतीचाही आहे. या हत्या प्रकरणात सुरुवातीला तिघे पकडले गेले. मात्र इतर पाच जण हाती यायला महिना उजाडावा लागला. या हत्याकांडाचा सूत्रधार म्हणून ज्याच्याकडे पाहिले जाते, तो संशयित आरोपी वाल्मीक कराडची हिंमत पाहा. तो आधी व्हिडीओ टाकतो आणि स्कॉर्पियो कारमधून पोलिसांना शरण येतो. एक आरोपी अजून मिळायचा आहे. देशमुखांचा भाऊ पाण्याच्या टाकीवर चढला तेव्हा खळबळ उडाली आणि हालचालींना वेग आला. दुसऱ्या दिवशी वाल्मीक कराड याच्या समर्थकांनीही आंदोलन केले. परळी बंद पडली. एका आरोपीच्या समर्थनासाठी शहर बंद पडण्याची ही पहिली घटना असावी. गृहमंत्री या नात्याने देवेंद्र फडणवीस यांनी या हत्येतले गांभीर्य ओळखले. त्यांनी सीआयडीकडे तपास दिला. त्यामुळे महिनाभराने का होईना, पोलिसांचा तपास बराच सरकला.

बीड हा तसा मागास जिल्हा. मात्र औष्णिक वीज प्रकल्प आणि पवनचक्की प्रकल्पातून येथे गुंडगिरी आली. औष्णिक प्रकल्पातून निघणाऱ्या राखेसाठी माफिया जन्माला आले तर पवनचक्की मालकाला खंडणीखोर सतावू लागले. अवादा या पवनचक्की कंपनीच्या मालकाकडे मागितलेल्या दोन कोटी रुपयांच्या खंडणीच्या आड आल्याने संतोष देशमुख यांची हत्या झाली, असा एसआयटी म्हणजे विशेष तपास पथकाला संशय आहे. वाल्मीक कराडवर सुरुवातीला खंडणी मागितल्याचा गुन्हा होता. मात्र आता त्याला मोक्का लावला असून एसआयटीने त्याची सात दिवसांची पोलिस कोठडी घेतली आहे. आणखी एक आरोपी विष्णू चाटे याच्या फोनवरून कराडच्या कंपनीच्या अधिकाऱ्याकडे खंडणी मागितली, पण केवळ फोनवरून बोलणे झाले. त्यावरून खुनाशी संबंध जोडून मोक्का लावला का? असा प्रश्न कोर्टाने तपास अधिकाऱ्यांना केला. सीआयडी भक्कम तयारी करून कोर्टाकडे गेली आहे. त्यामुळे संतोष देशमुखच्या कुटुंबीयांना न्याय मिळेल,



अशी उमेद जागी झाली आहे. कोर्टाचा मामला असल्याने त्यात वेळ जाणार, पण थोडी कळ सोसावी लागेल. दोषींना सोडणार नाही असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरुवातीलाच सांगितले आहे. एवढेच नव्हे, तर बीड आणि परभणी प्रकरणाच्या चौकशीसाठी त्यांनी जाहीर केल्याप्रमाणे निवृत्त न्यायाधीशांची समितीचीही स्थापन करण्यात आली आहे. हल्ली 'मीडिया ट्रायल'चे खूळ आले आहे. माध्यमे दररोज बातम्या पुरवून न्यायाधीश बनू पाहत आहेत.

या वाल्मीक कराडचेच उदाहरण घ्या. एकेकाळी वाल्मीक भाजपाचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्याकडे घरगडी होता. पुढे त्याने धनंजय मुंडेंशी जुळवून घेतले. पाहता पाहता त्याने स्वतःचे साम्राज्य निर्माण केले. 'वाल्मीक कराडशिवाय धनुभाऊचे पान हालत नाही' असे एकदा पंकजा मुंडे म्हणाल्या होत्या. तो जणू प्रती पालकमंत्री होता. त्याच्यावर वेगवेगळ्या प्रकारचे १४ गुन्हे आहेत. तरीही तो सरकारच्या 'लाडकी बहीण' योजना समितीवर होता. यावरून या कराडची किती मस्ती चालायची त्याची कल्पना येईल. आताही त्याच्यावर खंडणीचा गुन्हा आहे. त्याच्यावर खुनाचा गुन्हा लावा म्हणून जिल्ह्यात अनेक सर्वपक्षीय मोर्चे निघाले. आता कुठे खुनाच्या गुन्ह्यात रचलेल्या कटात तो सहभागी असल्याचे पुरावे मिळाल्याचे सीआयडी म्हणते. त्याला मकोका लागला तो यामुळे. मकोका कायदा अतिशय कडक आहे. त्यात आरोपीला जामीन मिळणे अवघड जाते. त्यामुळे आता कराडला सीआयडीपुढे पोपटासारखे बोलावे लागेल. कराडला पकडूनही बीडकरांचे समाधान झालेले नाही. त्यांचा संशय राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आहे. मुंडेच कराडला चालवत होते, असे त्यांचे म्हणणे आहे. अजून तरी कोण्या आरोपीने मुंडे यांचे नाव घेतलेले नाही. मुंडेच नव्हे तर त्यांच्या राष्ट्रवादीचे सुप्रीमो अजितदादा पवार हेदेखील तोच प्रश्न करायचे. नाव नसताना संशय का? असा अजितदादांचा प्रश्न असायचा. पण आता पाणी नाकातोंडात जाऊ पाहते आहे. बीडमध्ये जे काही घडले आहे, घडते आहे आणि घडणार आहे त्या सगळ्यांचा केंद्रबिंदू धनंजय मुंडे आहेत, अशी एकूण जनभावना आहे. मुंडे यांच्या पाठिंब्याशिवाय कराड एवढी मस्ती करू शकत नाही, असे चौकाचौकात उघड बोलले जात आहे. वाल्मीक कराड ही साऱ्याच राजकीय पक्षाच्या नेत्यांसाठी 'दुभती गाय' होती. त्यामुळे इतकी वर्षे त्याची ठाकूरकी चालली. त्या संतोष देशमुखांचा काय गुन्हा होता? निर्घृणपणे त्याला मारले. मारेकऱ्यांची हिंमत एवढी की, हत्येच्या घटनेचा व्हिडीओ केला. वाल्मीक कराडचे धंदे धनंजय मुंडे यांना माहीत नसतील, असे होऊ शकत नाही. 'कराड माझ्या जवळचा आहे' ही गोष्ट मुंडे यांनी नाकारली नाही. प्रकरण वाढणार नाही, अशी त्यांची कल्पना असावी. पण आग लागली आहे. पुढे चौकशीत निर्दोष ठरले तर मुंडे यांना पुन्हा सरकारमध्ये येता येईल. या मामल्यात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हेही उघडे पडले आहेत. आपल्या एका सहकाऱ्याचा साथीदार खुनाच्या आरोपाखाली पकडला जात असेल तर त्याच्या मंत्रिपदाचा राजीनामा घेतला पाहिजे, असे अजितदादांना अजूनही वाटत नाही, हे धक्कादायक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच आता तिसरा डोळा उघडण्याची वेळ आली आहे. राजकारणात चारित्र्य, नीतिमत्ता टिकली नाही तर मग जंगलराज दूर नाही. ते दिवस रोखायचे असतील तर देवेंद्र फडणवीस यांना कठोर व्हावे लागेल. कराड व्यक्ती नाही, प्रवृत्ती आहे. प्रत्येक जिल्ह्यात एक कराड आहे. फडणवीसांनी तो शोधून राजकारण शुद्ध करावे ही जनसामान्यांची अपेक्षा आहे.

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.) ९८५०३०४१२३

### सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य

राज्य सरकारमध्ये नोकरी करणारा माणूस वयाच्या ५८ व्या वर्षी निवृत्त होतो, तर केंद्र सरकारमध्ये नोकरी करणारा माणूस वयाच्या ६० व्या वर्षी निवृत्त होतो. शासकीय नोकरीत ही वयोमर्यादा निश्चित केलेली आहे. तथापि व्यापारी, खेळाडू व राजकारणातील मंडळींना मात्र निवृत्तीचे वय ठरलेले नसते. व्यापारी लोक साधारणतः त्यांचा मुलगा त्यांचा व्यापार सांभाळण्यास सक्षम झाल्यानंतर व स्वत:चे शरीर थकल्यानंतर निवृत्ती घेतात. खेळाडू त्यांची कामगिरी कमी झाल्यानंतर निवृत्तीचा विचार करतात. पण राजकारणातील लोकांना निवृत्तीची कुठलीही वयोमर्यादा नाही व त्यामुळे हे लोक स्वतःहून निवृत्त व्हायला तयार नसतात, असे दिसते.

क्रिकेट खेळाडूच्या बाबतीत दिग्गज खेळाडू सुनील गावस्कर यांनी केव्हा निवृत्त व्हायचे याबाबत योग्य मत दिले आहे. ते म्हणतात, खेळाडू जेव्हा आपल्या कामगिरीच्या उच्च स्तरावर असतो, तेव्हा त्याने निवृत्त व्हावे, म्हणजे तो लोकांच्या चांगला लक्षात राहतो. कामगिरी कमी झाल्यानंतरही खेळायला मिळत आहे म्हणून खेळणे हे लोकांना आवडत नाही व त्या खेळाडूबद्दल लोकांमध्ये वाईट मत तयार होते. याबाबतीत योग्य वेळी निवृत्ती घेणाऱ्या खेळाडूंचे उदाहरण सांगायचे झाल्यास सुनील गावस्कर, सचिन तेंडुलकर, कपिल देव ही मंडळी योग्य वेळी निवृत्त झालेली दिसते. या क्षेत्रात नुकताच निवृत्त झालेला स्पिनर आश्विन हा काहीसा अनपेक्षितपणे निवृत्त झालेला दिसतो. निवृत्तीनंतरचे आयुष्य म्हणजे खऱ्या अर्थाने पती-पत्नीला एकमेकांना वेळ देता येतो. सबब, ज्यांना ज्यांना निवृत्तीची वयोमर्यादा नाही, त्यांनी आपल्यासाठी कोणती तरी वेळ योग्य आहे याचा विचार करून स्वतः निवृत्त व्हावे व आयुष्य आनंदात जगावे.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

## वाचक पत्रे

### हिंगणघाट येथील रेल्वे समस्या

हिंगणघाट येथील रेल्वे समस्या नवीन नाहीत. मी पुन्हा महत्त्वाच्या ४-५ समस्या मांडत आहे. बलारशाहवरून मुंबई, पुणे येथे जाण्यासाठी आठवड्यात फक्त एकच दिवस गाडी आहे. तसेच या भागातील हजारो भाविक शेगाव येथे दर्शनास जात असता. येताना ११११२२ भुसावळ-वर्धा पॅसेंजरने वर्धा येथे रात्री ९ वाजता आल्यास बल्लारशाहकडे जाण्यास गाडी नाही. रात्रभर वर्धा स्टेशनवर राहावे लागते. सकाळी ६.३० वाजताच मेमु आहे. या समस्या दूर करणे आवश्यक आहे. तसेच २२१५१-२२१५२ पुणे-काझीपेठ-पुणे ही गाडी रोज सुरू करावी किंवा सध्या तरी आठवड्यातून ३ दिवस तरी करावी. २२१०९-२२११० बल्लारशाह-लोकमान्य टिळक-बल्लारशाह ही गाडी रोज किंवा कमीत कमी ३ दिवस तरी करावी. तसेच या मार्गावर शेगाव, मनमाड येथे थांबे नाहीत, ते देण्यात यावे. हेही शक्य नसेल तर २२१०९-२२११० ही गाडी ४ दिवस मुंबई व ३ दिवस कल्याण मार्गे पुणे अशी करण्यात यावी. ज्यामुळे सातही दिवस कमीत कमी कल्याण येथे जाता येईल व ४ दिवस (काझीपेठ) धरून पुणे येथे जाता येईल. ११२१२१-११११२२ भुसावळ-वर्धा पॅसेंजर बल्लारशाहपर्यंत वाढविण्यात यावी. बल्लारशाह-नागपूर-बल्लारशाह मेमू सुरू करण्यात यावी. धनबाद -कोल्हापूर, हिस्सार, बिकानेर, तसेच दानापूर या गाड्यांचे थांबे येथे देण्यात यावेत. प्रवाशांच्या मागणीकडे रेल्वे प्रशासन लक्ष देईल, अशी अपेक्षा आहे.

**चंद्रशेखर विष्णुपंत खापरे**/९४२३४२०१७१

### अतिक्रमणधारकांची बिलकूल हयगय नको

कोर्टाच्या आदेशाने का न होवो पण सध्या नागपुरात ठिकठिकाणी अतिक्रमण हटाव मोहीम जोरदार सुरू आहे. रस्ते मोठे झाले रे झाले की हे हातठेले, चिल्लर दुकाने फूटपाथवरच आपले ठाण मांडून बसतात. मोठ्या दुकानासमोरच बसतात. ना टॅक्स, ना विद्युत बिल यांना भरावे लागते. परंतु सरकारी रस्ता मात्र अडवून बसण्याचे देशप्रेम यांच्यात नक्कीच असते. एक माणूस आपले चार-पाच ठेले लावून बसतो. महिला ग्राहकांशी तर मुजोरी करतो. यात गरीब जागच्या जागी राहून संधिसाधू लोक आपला फायदा करून घेत आहे. कल्याणेश्वर मंदिर, केळीबाग रोड, बर्डी मेन रोड, कमाल टॉकीज चौक असे अनेक रस्ते आज यांनीच फुलून गेले आहे. आता तर ते मोर्चा काढून फूटपाथची अर्धी जागा हक्काने मागत आहेत. त्यांच्या मागणीचा सरकारने बिलकूल विचार करू नये आणि या कार्यात जो कोणी नेता, नगरसेवक, आमदार सहभागी होईल त्याला जनतेने चांगलाच धडा शिकवावा. या लोकांना एक वेगळा हॉकर्स झोन तयार करून द्यावा जो रस्त्याच्या मध्ये येणार नाही, रहदारीस अडथळा होणार नाही असा. शिवाय यांना अधिकृत ओळखपत्रे देऊन यांच्यापासून महानगर पालिकेने शुल्कही आकारावे. या अतिक्रमणकारी लोकांमध्ये किती नागपूरचे स्थायी आहेत व किती बाहेरून आले आहेत याचीही चौकशी करायला हरकत नाही. एकदा का यांची बाजू सावरली की हे सबंध नागपूर गिळंकृत केल्याशिवाय राहणार नाही.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### २६ स्वच्छता कामगारांच्या वारसांना नियुक्तीचे आदेश

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिका अंतर्गत ज्या स्वच्छता कामगारांनी स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतली आहे, जे स्वच्छता कामगार सेवा कालावधीत मृत्यु पावले आहेत, अशा एकुण २६ स्वच्छता कामगारांच्या वारसांना शासनाच्या लाड-पाडे समिती शिफारसीनुसार नियुक्ती आदेश वितरीत करण्यात आले आहेत.

बुधवार १५ जानेवारी रोजी आयुक्त धैर्यशील जाधव व उपायुक्त बबन तडवी यांच्या हस्ते हे आदेश वाटप करण्यात आले. यावेळी कर्मचारी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष के.के. आंधळे, अध्यक्ष नासेर खान पठाण, स्वच्छता कामगार उपस्थित होते. यावेळी आयुक्त धैर्यशील जाधव यांनी नियुक्त उमेदवारांना मार्गदर्शन करत आपले काम प्रमाणिकपणे करण्याच्या व आपल्या पालकांना सन्मानाची वागणुक देऊन सांभाळ करण्याच्या सुचना केल्या. दरम्यान, अध्यक्ष के.के. आंधळे, अध्यक्ष नासेर खान पठाण यांनी नियुक्ती आदेशाचे वापट केल्यामुळे संघटनेच्या वतीने आयुक्त यांचे आभार व्यक्त केले.

### रामकथा एक दर्पण ग्रंथ विष्णु महाराज बादाड यांचे प्रतिपादन : जिंतूरात सप्ताह

**जिंतूर,/प्रतिनिधी :** श्री राम कथा हा चित्र ग्रंथ नाही, हा शब्द ग्रंथ नाही तर रामकथा हा दर्पण ग्रंथ आहे. दर्पण म्हणजे आरसा, त्यामुळे आरसा जसे आपले प्रतिरुप दाखवण्याचं काम करतो, त्याप्रमाणेच रामकथाही आपल्याला आपलं स्वरूप दाखवते, असे मत हभप रामायणाचार्य विष्णु महाराज बादाड यांनी व्यक्त केले.

चारठाणा येथून जवळच असलेल्या वाई बोथ (ता.सेलु) या गावी सुरु असलेल्या श्री राम कथांमधून हभप रामायणाचार्य विष्णु महाराज बादाड यांनी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन केले. पुढे बोलतांना ते म्हणाले, रामप्रभुचे चरित्र एक आदर्श राजा, आदर्श भाऊ, एक बाणी, एक वचनी राजा, एकनिष्ठ मित्राची कथा आहे, असे नमूद करीत कुटूंबप्रमुख कसा असावा हे राम प्रभुचे चरित्र वाचल्यानंतर, ऐकल्यानंतर कळेल, असे ते म्हणाले. संसारीक प्रापंचिक माणसाला सुखी जीवन जगण्यासाठी राम कथा श्रवणाची गरज आहे, असे मतही हभप विष्णु महाराज बादाड यांनी व्यक्त केले.दरम्यान, या कथा सोहळ्यास मोठ्या संख्येने भाविक भक्तांची उपस्थिती होती.

### पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह खदानीत टाकला, आठ जणांवर गुन्हा दाखल

**सेलू,/प्रतिनिधी :**डुकराच्या शिकारीसाठी गेलेल्या एकाचा वीज प्रवाह सोडलेल्या तारेचा स्पर्श लागून मृत्यू झाला. यावेळी त्याच्यासोबत असलेल्यांनी या घटनेचा पुरावाच नष्ट करण्यासाठी मृतदेह चक्क खदाणीत फेकून दिला. ऑक्टोबर महिन्यात घडलेल्या या घटनेचा पोलिस तपासात आता खुलासा झाला असून या प्रकरणी आठ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

शहरातील वालूर नाका परिसरातील रहिवासी संतोष प्रकाश पवार (वय २२) बेपत्ता झाल्याची तक्रार त्याचे वडील प्रकाश पवार यांनी २ नोव्हेंबर रोजी सेलू पोलिसांत दिली होती. पोलिसांच्या तपासणीत मंगळवारी (ता. १४) या प्रकरणातील एक मृतदेहाचा शोध लागला. बेपत्ता असलेल्या संतोष पवार याचा वीज प्रवाहचा धक्क्याने मृत्यू झाला होता. मात्र, या प्रकरणात पुरावा नष्ट करण्याचा हेतुने मृतदेह सेलू तालुक्यातील डिग्रसवाडी (खुर्द) शिवारातील खोल खदाणीत फेकून दिल्याचे निष्पन्न झाले. यात एकूण आठ जणांवर पोलिसांत गुन्हा दाखल झाला.

नगर परिषदेचा डम्पिंग ग्राऊंडच्या जवळ असलेली प्रकाश नावाडे यांच्या मालकीची शेती बबन गोरे यांनी ठोक्याने वहितीस केली आहे. त्यांनी शेती पिकांचे प्राण्यांकडून नुकसान होऊ नये या कारणाने शेतीचा धुऱ्याच्या कडेला लोखंडी तार लाऊन त्यात वीजप्रवाह सोडला होता. यामधून जीवित हानी होण्याची शक्यता असतानाही वीज प्रवाह सोडला. ३१ ऑक्टोबर रोजी संतोष प्रकाश पवारचा या तारेचा धक्का बसून मृत्यू झाला. अर्जुन गंगाराम काळे, रमेश सखाराम काळे, दीपक भीमा चव्हाण, सुभाष काळुराम काळे, (सर्व राहणार वालूर नाका, सेलू), चंदर कठाळू चव्हाण (रा. मौलाना आझाद नगर, सेलू व इतर दोन) यांच्यासह संतोष पवार असे मिळून ३१ ऑक्टोबर २०२४ चा रात्री डुकराच्या शिकारीसाठी गेले होते. यावेळी वीज प्रवाह सोडलेला लोखंडी तारेचा धक्का बसून संतोष पवारचा मृत्यू झाला. हे प्रकरण आपल्यावर येऊ नये म्हणून आरोपींनी संगनमत करून मृत संतोषच्या मृत्यूचा पुरावा नष्ट करण्यासाठी डिग्रसवाडी शिवारातील हरीचंद्र राठोड यांच्या खदाणीत लोखंडी जाळीस बांधून मृतदेह फेकल्याचे आरोपींनी कबूल केले. एका आरोपीस ताब्यात घेऊन उपविभागीय पोलिस अधिकारी जीवन बेनीवाल, पोलिस निरीक्षक दीपक बोरसे, जमादार मधुकर जाधव, अशोक हिंगे, सुरेश पुलाते घटनास्थळी झाले. मंगळवारी (ता. १४) सायंकाळी मृतदेह बाहेर काढला.

### राज्यातील १३२ आयटीआयच्या नावात बदल- अध्यादेश जाहिर

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्यातील १३२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची नावं बदलण्यास कौशल्य, रोजगार, उद्योजकता विभागाने बुधवार १५ जानेवारी रोजी मान्यता बहाल करीत त्यासंबंधीचा अध्यादेशही लागू केला आहे.

राज्यात शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमार्फत (आयटीआय) शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनेंतर्गत (सीटीएस) प्रशिक्षण देण्यात येते, या योजनेचा मुख्य उद्देश हा युवकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देवून त्यांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी सक्षम बनविणे व खाजगी औद्योगिक आस्थापनांना लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करणे असा आहे. सद्यस्थितीत राज्यात ४१९ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व ५८५ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत.

८ ऑक्टोंबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार या विभागाच्या मंत्री महोदयांची एक सदस्यीय समिती त्या त्या जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्याशी विचारविनिमय करुन नावात बदल करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल, असे ठरविण्यात आले होते.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

# जुना पेडगाव रस्ता वाहतुकीच्या कोंडीने लुप्त

## दिवसभर प्रचंड वर्दळ : धुर आणि धुळीचे लोड, व्यापाऱ्यांसह नागरिक अक्षरशः हैराण

**मोहन धारासुरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी-:** जिंतूर रस्त्यापासून ते दर्गापर्यंतच्या जूना पेडगाव रस्त्यावर गेल्या काही महिन्यांपासून वाहतूकीचा मोठा ताण आला असून त्यामुळे पहाटेपासून रात्री उशीरापर्यंत या रस्त्यावर वाहनांच्या गर्दीने मोठी कोंडी होत आहे. विशेषतः धूर आणि धुळीच्या लोळांमुळे रस्त्या लगतच्या दुतर्फा व्यापाऱ्यांसह हजारो कुटूंबिय अक्षरशः हैराण झाले आहेत.

जूना पेडगाव रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर लांबपर्यंत वसाहती पसरल्या आहेत. या वसाहतीतून हजारो सामान्य व मध्यमवर्गीय कुटूंबियातील नागरीक वास्तव्यास आहेत. या नागरिकांच्या दैनंदिन व्यवहाराच्या दृष्टीने जूना पेडगाव रस्ताच एकम व मोठा पर्याय आहे. त्यामुळे या रस्त्यावर नागरीकांची कामानिमितताने मोठी ये-जा आहे. शालेय विद्यार्थी, महिला, अबालवृध्द व नागरीकांच्या वर्दळीने हा रस्ता सदैव गजबजलेला राहिला आहे.

याच भागात मोठ्या प्रमाणावर कोचिंग क्लासेस, शाळा, महाविद्यालये, खाजगी रुग्णालय, मंदिर, व्यापारी प्रतिष्ठाने, एजन्सीज वगैरेंची संख्याही लक्षणीय आहे. त्यामुळेच रस्ता अक्षरशः वाहता आहे.

परंतु, अलिकडे या रस्त्यावर वाहतूकीची दररोज कोंडी सुरु झाली आहे. त्याचे कारण म्हणजे या रस्त्याला पॅरलल असणारा दर्गाह रस्त्याच्या रुंदीकरणासह सिमेंटीकरणाचे काम गेल्या एक-दीड वर्षांपासून सुरु आहे. पर्यायाने त्या भागातील वाहतूक जूना पेडगाव रस्त्यामार्गेच सुरु झाली आहे. त्यामुळेच दररोज वाहतूकीची कोंडी नित्याचीच बाब बनली आहे.

सकाळपासून दररोज कर्णकर्कश्य असे हॉर्नचे आवाहन, धुळीचे लोळ, धूळ आणि वाहनांची ये-जा, बेशिस्त अशी वाहतूक, त्यातून दररोज घडणारे छोटे-मोठे अपघात नित्याचेच बनले आहेत. सायंकाळी तर या रस्त्यावरुन ये-जा करणे कसरतीचेच काम आहे. कारण वाहनांच्या दिव्यांचा खेळ डोकेदुखी बनला आहे. त्यातच आता जड वाहनांचीही वर्दळ या भागातून सुरु झाली आहे. त्यामुळे या रस्त्यावरुन पादचाऱ्यांना ये जा करणे एक दिव्य ठरले आहे.

या रस्त्यावरील वाहतूकीचा ताण कमी करावा, पर्यायी मार्गांचे सक्षमीकरण करावे, बेशिस्त वाहतूकीस शिस्त लावावी, पार्कींगचे स्टॅन्ड निश्चित करावेत, रस्त्यावरील अतिक्रमणे हटवावीत यासह अन्य मागण्यांसाठी या भागातील सामाजिक कार्यकर्ते तथा भारतीय जनता पार्टीचे महानगर जिल्हा उपाध्यक्ष संजय कुलकर्णी यांनी जिल्हा महसूल प्रशासन, पोलिस प्रशासन व शहर वाहतूक यंत्रणेकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यातून काहीशा प्रमाणात हालचाली झाल्या. विशेषतः शहर वाहतूक यंत्रणेने पेट्रोलिंग सुरु केली, परंतु या परिसरात ठोस उपाययोजनांची नितांत गरज आहे, त्याशिवाय वाहतूकीची कोंडी थांबणार नाही. वाहतूक सुरळीत होणार नाही. अलिकडे या रस्त्याच्या रुंदीकरणासह डांबरीकरणाचे काम सुरु केल्या गेले दुर्दैवाने ते काम कासवगतीने होत राहिले. दर्गाह परिसरातील काम अद्यापही बाकी आहे. काही ठिकाणी कामे अर्धवट अवस्थेत रखडली आहेत. त्यामुळे त्या भागातील नागरीकांना असंख्य अडचणींना सामोरे जावे लागत आहे. शिवनेरी नगर, लक्ष्मी नगर, बालाजी नगर, नेहरु नगर, आसारामबापू नगर वगैरे वसाहतीतील नागरीक हैराण आहेत.

### आता उर्साच्या गर्दीचा लोड वाढणार.....

**जूना पेडगाव रस्त्यावरील वाहतूकीच्या या कोंडीत आता उर्सातील गर्दीचा भर पडणार आहे. आधीच या भागातून उर्सा निमित्त परिवहन महामंडळाच्या बसेस धावत असतात. दर्गा रस्त्यावरील रखडलेल्या कामामुळे आता जूना पेडगाव रस्ता मार्गेच दर्गाकडील सर्व वाहतूक वळविली जाणार हे स्पष्ट आहे. त्यामुळे फेब्रुवारीच्या १५ ते २० दिवसांमध्ये या रस्त्यावरील वाहतूकीची काय स्थिती असेल, या विचंचनेनेच, चिंतेनेच नागरीकांचे तोंडचे पाणी पळाले आहे. शहर वाहतूक यंत्रणा, महापालिका प्रशासनाने या संदर्भात गांभीर्याने विचार विनिमय करावा, पर्यायी मार्ग काढावेत, अशी अपेक्षा या भागातील सामाजिक कार्यकर्ते व्यक्त करीत आहेत.**

### पाथरी रस्त्यामार्गे वाहतूक वळवा...

**उर्साच्या या दरम्यान पाथरी रस्त्यामार्गे वाहतूक वळवावी, असा सूर या भागातील सामाजिक कार्यकर्ते व्यक्त करीत आहेत. पाथरी रस्त्यावरील कालव्या लगतच्या जून्या कच्च्या रस्त्याचे तातडीने मजबुतीकरण करावे व त्या पुलापासून बसेससह चारचाकी वाहनांची वाहतूक तिकडून वळवावी तरच जूना पेडगाव रस्त्यावरील वाहतूकीचा ताण कमी होईल, असे मत हे कार्यकर्ते व्यक्त करीत आहेत.**

### उर्सापर्यंत दर्गा रस्त्याचे काम अशक्य..

**गेल्या एक दीड वर्षापासून कासव गतीने सुरु असलेल्या दर्गा रस्त्याच्या रुंदीकरणासह डांबरीकरण व सिमेंटीकरणाच्या कामांना आणखीन किती महिने लागणार, हे स्पष्ट नाही, यंत्रणा व एजन्सीधारक या बाबत मौन बाळगून आहेत. जिंतूर रस्त्यावरील स्वागत कमानी पासून डॉ. दहिफळे यांच्या रुग्णालयापर्यंत कसबसे काम पोहोचले आहे. नाल्यांची कामेही पूर्ण झाली आहेत. परंतु, तेथून पुढे दर्गा पर्यंतचे काम संथगतीने सुरु आहे. त्याचा परिणाम बँक, कॉलनी, मुन्सिपल कॉलनी, सालासार नगर, गणेश नगर, दर्गा परिसर, गालिब नगर, शांती नगर तसेच जांब, कौंडगाव व पारव्याकडे जाणाऱ्या ग्रामस्थांचेही महिनोन महिन्यापासून मोठे हाल सुरु आहेत.**

## स्वत:तील सुप्त गुण ओळखून महिलांनी सक्षम व्हावे- डॉ.बंगाळे

**परभणी,/प्रतिनिधी:** महिलांनी त्यांच्यातील सुप्त गुण ओळखून स्वत:ला सक्षम करणे ही काळाची गरज आहे, असे मत डॉ. जया बंगाळे यांनी व्यक्त केले.

वनामकृविचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी यांच्या निर्देशानुसार व संचालक, विस्तार शिक्षण डॉ. गिरधर वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली 'एक दिवस माझ्या बळीराजासोबत' या अभियानांतर्गत सामुदायिक विज्ञान महाविद्यालय व कृषि विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सावळी (ता.मानवत) येथे महिला शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला. यावेळी डॉ. बंगाळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. शेतकरी महिलांचे घरकामासोबतच शेतीच्या कामातही फार मोठे योगदान असल्याने त्यांच्या काबाडकष्टांची जाणीव कुटुंबाला व समाजाला असणे अतिशय आवश्यक आहे, आपल्या कुटुंबासाठी कष्ट घेण्याकरिता महिला या सदैव तत्पर असल्यातरी कुटुंबियांनी त्यांच्या कामात हातभार लावणे आवश्यक आहे, असे मत डॉ. बंगाळे यांनी व्यक्त करीत अद्यापही विशेषत: ग्रामीण विभागात बाल विवाहाचे प्रमाण हे अधिक असल्याने त्याचे मुलींवर होणारे दुष्परिणाम सांगून त्यावर निर्बंध घालण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

या कार्यक्रमात 'स्वास्थ्यवर्धक जीवनासाठी समतोल आहाराचे महत्व' या विषयावर डॉ. आश्विनी बिडवे यांनी उपस्थित महिला शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या कुटुंबियांच्या आहारात कडधान्ये, हिरव्या भाज्या, फळ भाज्या, ऋतूनुसार उपलब्ध असणारी फळे व दुग्धजन्य पदार्थांचा समावेश करणे गरजेचे आहे, असे त्या म्हणाल्या. याबरोबरच परसबागेमध्ये शेवगा, कडीपत्ता, लिंबूची झाडे, भाज्या लावण्याविषयीही त्यांनी मार्दर्शन केले. यावेळी प्रा. ज्योती मुंडे यांनी शेतकरी महिलांचे शेतीकामातील श्रम कमी करण्यासाठी महाविद्यालयातील अखिल भारतीय समन्वयित संशोधन योजनेअंतर्गत विकसित केलेले तंत्रज्ञान जसेकी कापूस वेचणी कोट, सोयाबीन हातमोजे, हळद पिकासाठी उपयुक्त अवजारे आदींबाबत प्रात्यक्षिकाद्वारे सविस्तर माहिती देऊन त्यांचा वापर शेतीकामात करण्यासाठी उद्युक्त केले.

कार्यक्रम समन्वयक डॉ. प्रशांत भोसले यांनी कृषि विज्ञान केंद्र अंतर्गत प्रामुख्याने महिला शेतकऱ्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उत्तम कापूस निर्मिती प्रकल्पांतर्गत पीक लागवड ते काढणीपश्चात तंत्रज्ञानामध्ये उत्पादन खर्च कमी करून तसेच जैव संवर्धक महिला सुलभ तंत्रज्ञानाचा वापर नैसर्गिक व जैविक निविष्ठांचा वापर इत्यादी गोष्टींचा अंतर्भाव करून उत्पादनात वाढ करण्यासाठी सदरील प्रकल्पात कार्ये केली जात असून शेतकरी महिलांचा त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे, असे आपल्या मार्गदर्शनपार भाषणात नमूद केले. तसेच महिला सबलीकरणासाठी राबविले जाणाऱ्या विविध उपक्रमांबद्दल त्यांनी यावेळी माहिती दिली.

## शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहचवा-पाटील

### कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची आढावा बैठक

**परभणी,/प्रतिनिधी:** शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी व त्यांच्या प्रगतीकरीता शासनाच्या विविध योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवून त्यांना या योजनांचा लाभ प्राधान्याने द्यावा, असे निर्देश कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी दिले.



मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रकरणांची दखल घेऊन त्यावर तातडीची उपाययोजना करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांकरीता अन्न सुरक्षा, आरोग्य सेवा आणि शेती विकासाचे कार्यक्रम राबविणे व त्यांच्या मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणे अशा उपायायोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाच्यावतीने कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची पुर्नरचना करण्यात आली आहे. मिशनचे अध्यक्ष श्री. पाटील यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत शेतकऱ्यांशी संबंधित विविध विषयांचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपजिल्हाधिकारी संगीता चव्हाण यांच्यासह कृषी, रोहयो, कृषी विद्यापीठ, रेशीम, शिक्षण, आरोग्य, वन, कौशल्य विकास, सहकार, लिड बँकेचे अधिकारी उपस्थित होते.

शेतकरी हा जगाचा पोशिंदा म्हणून ओळखला जातो, त्यामुळे त्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे, असे सांगून श्री. पाटील म्हणाले की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शासन अनेक महत्त्वाच्या योजना शेतकऱ्यांकरीता राबवित आहे. त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे काम संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी जबाबदारीने करावे. शेतकऱ्यांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी तालुकास्तरावर रोगनिदान शिबीरं आयोजित करावीत. सावकारी प्रकरणे तातडीने निकाली काढावीत.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना देण्यात येणाऱ्या मदतीची प्रलंबित प्रकरणे तातडीने मार्गी लावावीत. मुलांसाठी शिक्षणाची उत्तम सोय, स्पर्धा परिक्षा वाचनालय, शाळेत पटांगणाची सुविधा उपलब्ध करुन द्यावी. कौशल्य विकास योजनांची प्रचार-प्रसिध्दी करावी. भरघोस उत्पन्न देणाऱ्या रेशीम शेतीला प्रोत्साहन द्यावे. पिकविमा कंपनीच्या प्रतिनिधीचे नाव व मोबाईल क्रमांक ग्रामपंचायत कार्यालयात दर्शनी भागात बोर्डावर ठळक नमूद करावा. कृषी उत्पन्न बाजार समिती येथे शेतमालांचा किमान आधारभूत मूल्याचा फलक दर्शनी भागावर लावावा. जिल्यारात शेतकऱ्यांसाठीचा प्रेरणा प्रकल्प प्रभावीपणे राबवावा. वन्य प्राण्यांपासून शेतकऱ्यांच्या होणाऱ्या नुकसान भरपाईचे प्रकरणे प्रलंबित ठेवू नयेत. गायरान जमिनीवर चारा लागवड करुन शेतकऱ्यांना चारा उपलब्ध करुन द्यावा, या सूचना श्री. पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच निरोगी जीवनासाठी सेंद्रीय शेतीकडे शेतकऱ्यांनी वळावे, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हाधिकारी श्री. गावडे यांनी श्री. पाटील यांनी दिलेल्या सुचनांचे पालन करुन जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी प्रशासन निश्चितपणे प्रयत्न करेल, असे सांगितले. श्रीमती ढालकरी यांनी सादरीकरणाव्दारे सविस्तर माहिती दिली.

## गंगाखेडच्या संत जनाबाई महाविद्यालयाची पीएम उशा योजनेत निवड प्रशासकीय समितीची पहिली बैठक संपन्न

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** येथील जुन्या आणि नामांकित संत जनाबाई शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची केंद्र सरकारच्या पीएम ऊषा योजनेत निवड झाली आहे. या योजनेअंतर्गत करावयाची खरेदी आणि निधी विनियोगासंदर्भात प्रशासकीय समितीची पहिली बैठक आज दि. १५ जानेवारी रोजी संपन्न झाली. या बैठकीत अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी ( आयक्यूएसी ) कक्षात संपन्न झालेल्या बैठकिच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष प्रा. डॉ. आत्माराम टेंगसे हे होते. संस्था सचिव ॲड संतोष मुंडे, सहसचिव दशरथ चौधरी, प्राचार्य तथा राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाचे सचिव प्रा. डॉ. बी. एम. धुत, समिती सदस्य गोविंद यादव, पंकज भंडारी आदिंची ऊपस्थिती होती. शिक्षा निती २०20 अंतर्गत विद्यार्थ्यांना व्यवसायाभीमूख शिक्षण



देण्याबरोबरच महाविद्यालये आधुनिक तंत्रज्ञान युक्त बनवले जाणार आहेत. तसेच महाविद्यालयांचा लाभ केवळ विद्यार्थ्यांपुरता मर्यादित न राहता तो समाजालाही व्हावा, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. या योजनेत गंगाखेडच्या संत जनाबाई महाविद्यालयाची निवड झाली आहे. याअंतर्गत संस्थेस अनुदान मंजूर झाले असून पहिला हप्ता प्राप्तही झाला आहे. राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळांचे आयोजन, नवीन अभ्यासक्रमांची सुरूवात, निधीचा विनियोग, साहित्य खरेदी आदी बाबतचे निर्णय आज संपन्न झालेल्या बैठकीत घेण्यात आले. या निर्णयांनुसार अनेक अत्याधुनिक यंत्र सामग्रीची खरेदी केली जाणार आहे. ज्यांचा उपयोग विद्यार्थ्यांसह समाजातील विविध घटकांना करून दिला जाईल. याबरोबरच महाविद्यालय आधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज केले जाणार आहे. सर्वांच्या सहयोगातून ही योजना यशस्वीपणे राबविण्याचा निर्धार याप्रसंगी व्यक्त करण्यात आला. बैठकीचे प्रास्तावीक प्रा. डॉ. एस व्ही क्षीरसागर यांनी केले. तर ऊपस्थितांचे आभार प्रा. डॉ. डी. जी. ऊजळंबे यांनी मानले.

# शिंदेसेनेने ठेवले ए.जे.बोराडे वेटींग ॲण्ड वॉच वर!

## पक्ष प्रवेशाला बड्या नेत्याचा विरोध तर बोराडे मुंबईत तळ ठोकुन?

**जालना । प्रतिनिधी**

काही महिन्यांपुर्वीच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत परतुर–मंठा विधानसभा मतदार संघातुन महाविकास आघाडीकडून निवडणुक लढलेले आणि पराभुत झालेले शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख ए.जे.बोराडे हे गेल्या तीन ते चार दिवसांपासुन मुंबईत तळ ठोकून असुन ते शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती विश्वसनीय सुत्रांकडून प्राप्त झाली आहे, परंतु शिंदेच्या शिवसेनेत त्यांच्या प्रवेशाला महायुतीतील बड्या नेत्यांचा विरोध असल्याने ऐ.जे.बोराडे हे वेटींग ॲण्ड वॉचवर ठेवले असल्याचे समजते.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, विधानसभेच्या निवडणुकीत राज्यात महायुतीने घवघवीत यश प्राप्त केले, या घवघवीत यशानंतर महायुती मध्ये इनकमिंग मोठ्या प्रमाणात वाढली आहे. यातच जालन्याचे शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे आसाराम जिजाभाऊ बोराडे हे देखील एकनाथराव शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे माहिती आहे. अवघ्या काही महिन्यांपुर्वी परतुर–मंठा विधानसभा मतदार संघातुन त्यांनी महाविकास आघाडीकडून निवडणुक लढवली मात्र त्यात त्यांना यश आले नाही, या निवडणुकीत महायुतीचे माजीमंत्री तथा आ.बबनराव लोणीकर यांनी पुन्हा विजयश्री खेचून आणून बोराडेंना पराभवाचे पाणी पाजले. त्यामुळे त्यांचे राजकीय अवसान गळून गेल्याची स्थिती मतदार संघातील वातावरणावरून स्पष्ट होत आहे. पराभवाची त्यांनी आत्मपरिक्षण करण्याऐवजी एकनाथराव शिंदेच्या सेनेत जाण्याचे पसंत केल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. याबाबत बोरांडे यांच्या संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या संपर्क होऊ शकला नाही.



### आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवुन प्रवेश!

**आगामी काळात होणाऱ्या स्थानिक निवडणुका लक्षात घेऊन आणि उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेची झालेली मतदार संघातील स्थिती पाहता केवळ आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवुन आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी हा प्रवेश असल्याचे कार्यकर्ते बोलतांना व्यक्त करत आहेत.**



# जिल्हाधिकारी पांचाळ यांचे हस्ते महारेशीम अभियानाची सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

सन २०२५–२६ मध्ये तुती लागवड समुहात मनरेगा, सिल्क समग्र–२ योजने अंतर्गत तसेच वैयक्तीक नविन तुती लागवड करण्यासाठी उत्सुक असलेल्या शेतकऱ्यांची नोंदणी करण्यासाठी दि. ९ जानेवारी ते ९ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत जिल्ह्यात महा–रेशीम अभियान २०२५ राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने जिल्ह्यात महारेशीम अभियान २०२५ च्या रथास जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांचे हस्ते आज (दि.१७) रोजी हिरवी झेंडी दाखवुन सुरुवात करण्यात आली.

यावेळी रेशीम विकास अधिकारी श्री. मोहिते यांच्यासह शेतकरी बांधव आणि इतर अधिकारी – कर्मचारी उपस्थित होते.

## संक्षिप्त



आज नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी कृषी बाजार समिती येथे जालना कृषी उत्पन्न बाजार समितीचे चे संचालक व शिवसेना शहर प्रमुख तथा नगरसेवक तथा गट नेते मा.श्री. विष्णू भाऊ पाचफुले यांनी सदिच्छा भेट दिली असता उपस्थित सचिव बी. के. जाधव, राकेश शिंदे, सुनिल घुटे, ग्रा. पं. सदस्य ज्ञानेश्वर धुळे, सुभाष राजपूत, राम भुतेकर, पांडू शेठ खैरे यांनी सत्कार केला..!!

### रेल्वेच्या विकास जालन्याचा विकास –भास्कर आंबेकर



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

दिनांक १६ जानेवारी गुरुवार रोजी रेल्वे स्टेशन समोर टिपू सुलतान चौक येथे जालना रेल्वे संघर्ष समितीतर्फे जालना जळगाव –जालना खामगाव व जालना बीड ,संभाजीनगर ते परभणी दुहेरीकरण व इतर रेल्वे विषयी धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले होते या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती शिवसेना जिल्हाप्रमुख भास्कर आंबेकर यांनी जालना रेल्वेला भरपूर जमीन असून व क्रीडा मैदाना असून त्याचा उपयोग विकासाच्या कामाने करावे जालना जळगाव व जालना खामगाव हे मंजूर झालेली रेल्वे लाईन ला केंद्रशासनाने या बजेटमध्ये २०२५ च्या निधी दिली पाहिजे जालना हे भारताचे मध्यभागी असून उत्तर दक्षिण पूर्व पश्चिम रेल्वे जोडण्यासाठी मनमाड पेक्षा मोठा जंक्शन होईल असे आंदोलनाच्या वेळी मार्गदर्शन केले व्यापारी महासंघाचे विनीत सहानी यांनी जालना मोठे जंक्शन झाले तर उद्योग,व्यापार मध्ये भक्कम वाढेल अशी गवाही दिली या कार्यक्रमाचे फिरोज अली मौलाना यांनी रेल्वे संघर्ष समितीचे कार्य व यशमोलाचे आहे ,असा उल्लेख केला असेचे आंदोलन चालले तर जालन्याची रेल्वेच्या विकास व नागरिकांना सवलत मिळेल व ज्येष्ठ नागरिक पत्रकार ,खेळाडू यांची पूर्वीप्रमाणे सवलत सुविधा सुरू करावी असे ही घोषणा देण्यात आली या आंदोलनामध्ये रेल्वे संघर्ष समितीचे सचिव अशोक मिश्रा, सत्कार मामा डॉक्टर राधेश्याम जयस्वाल धर्मा खिल्लारे ,डॉक्टर केदार करवा ,गोपाल भु रेवाल ,सुरेश सद्गुरु श्रीकांत पांगारकर ,दिनकर घेवंदे ,ताज अहमद खान सर, मोमीन अन्सारी नितीन चौधरी ,एडवोकेट हरिश्चंद्र चौधरी पी .जे . चांद सर अभय यादव, यांची उपस्थिती होती.



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

राज्यस्तरीय ज्युनिअर सेपक टाकरा सपर्धेकरिता जालना जिल्ह्याचा संघ वर्धा येथे रवानासंघाला शुभेच्छा देताना अध्यक्ष शेख इब्राहिम, पत्रकार तथा ऑफिशियल शेख महेजबिन मॅडम, संस्थापक सचिव शेख चांद पिजे यांच्यासह आदी.

# श्री स्वामी नरेंन्द्रचार्य महाराज नाणीजधाम यांच्या प्रतिवर्षाच्या निमित्याने रक्तदान शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**माहोरा/प्रतिनिधी**

जाफ्राबाद तालुक्यातील माहोरा येथील श्री स्वामी नरेंद्रचार्य यांच्या प्रतिवर्ष निमित्याने रक्तदान शिबिराचे आज दि. १६ जानेवारीला आयोजन श्री.हॉस्पिटल डॉ. रविंन्द्र कासोद,व शरद पवार माद्यमिक विद्यालय वालसा (वडाळा) यांच्या संयुक्त विद्यमानाने रक्तदान शिबिर ठेवेलले होते.या रक्तदान शिबिरास चे सभापती दगडु बा अन्ना गोरे,सरपंच गजानन पा.लहाने,डॉ. कासोद, प्राचार्य उत्तम झाल्टे,आदीच्या रक्तदानाचे सुरुवात करण्यात आले. व रक्त दानास भरपुर असा प्रतिसाद रक्तदान कार्यकर्ते व श्री.स्वामी नरेन्द्र चार्य यांचे शिष्य भक्तगणाकडुन प्रतिसाद मिळाला. या जिल्हाध्यक्ष स्वामी नरेन्द्र चार्य स्वामी सेवाधारी मंडळ नवनाथ पवार, साहेबराव दळवी फौजी, सुभाष नाना बोरसे, उषाबाई मोरे, अल्लाबाई दळवी, पार्वताबाई शेजुळ, द्वारकाबाई लहाने,मधुकर पवार,मंडळ अधिकारी गजानन व्हि.लहाने, नंदु पा. कासोद,नवलसिंग जाधव, बि.एस. बोर्डे, बाळासाहेब गव्हले,संतोष गौरकर, संतोष वरपे, गणेश कासोद, गणेश पगारे,रमेश दळवी, विष्णु दळवी, वामनराव कोरडे, कृष्णा शेजुळ, शरद पवार माद्यमिक विद्यालयाचे प्राचार्य यु.जे.झाल्टे,बि.एस. कासोद, आय.एस.इंगळे, ए.एस.खरात,पि.ए.शेळके, एन.एस.वाघ, एस.पी.पोटे, यांच्या सह समाधान शेजुळ, गणेश सातव, गणेश इंगळे, राजु दळवी,तुकाराम इंगळे, अंकुश इंगळे, वैभव मुद्दे,निशात कासोद,अक्षय कासोद,कार्यक्रमाचे आयोजक डॉ.कासोद यांनी सांगितले कि.१५१जनांनी रक्तदान केले.आदी सह रक्तदान शिबिर यशस्वी केले.



## विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थीनीने राष्ट्रीय स्तरावर मारली बाजी

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**



येथील विवेकानंद इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी कु. श्रावणी ज्ञानेश्वर जाधव हिने मिनी गोल्फ स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक पटकावत सिल्वर मेडल मिळवत स्वतः सह शाळेचे नाव उचावले असून तामिळनाडू येथील सेलम शहराचे पोलीस कमिशनर व आपले पश्चिम महाराष्ट्राचे आमदार सुधाकर कवळे यांनी कु.श्रावणीचे सिल्वर मेडल देऊन कौतुक केले आहे. या यशात विवेकानंद इंग्लिश स्कूलचे क्रीडा शिक्षक ज्ञानेश्वर चिमाजी जाधव यांचा मोलाचा वाटा असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली श्रावणी जाधव ही उंच शिखरापर्यंत चे यश संपादन करू शकली. या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष संदीपराव बाहेकर व शाळेचे मुख्याध्यापिका रश्मी यादव मॅडम तसेच परतूर येथील प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापिका संगीता शिंदे मॅडम श्रावणी जाधव शाळेचे क्रीडा शिक्षक ज्ञानेश्वर जाधव या दोघांनाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले व शुभेच्छा दिल्या आहेत.

# अनावश्यक खर्चाला फाटा...

## शत्रुघ्न कणसे यांनी गरजूंना उबदार चादर वाटप व अन्नदाना करिता गंगा भारती संस्थानला ११ हजार रुपये देत केला मुलाचा वाढदिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

समाजात वावरत असतांना वाढदिवस म्हणजे शोशा,पार्ट्या,इव्हेंट, फटाक्यांची आतिषबाजी,ढोल ताशे, कर्कश आवाजात वाजणारे डिजे हा जणू आज काळ फॅशनच झाल्याचे दिसून येत आहे आणि यावर होणारा अफाट खर्च आपण नेहमीच पाहत असतो. पण याला अपवाद आहे कणसे कुटुंबीय मागील अनेक वर्षापासून आपल्या घरातील व्यक्तीचा वाढदिवस कोणत्या ना कोणत्या उपक्रमाने साजरा करतात. दिनांक १७ जानेवारी रोजी भाजपचे तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे यांचा मुलगा जयेश चा वाढदिवस म्हणून त्यांनी शहरातील गोर गरीब कुटुंबांना उबदार चादरी वाटप करून साजरा केला.

सद्या कडाक्याची थंडी पडत आहे यामुळे गोर गरीब,भिक्षू लोकांची अनास्था पाहून त्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी निर्णय घेतला की मुलाचा वाढदिवस हा कोणत्या हॉटेलमध्ये किंवा मोठ्या रेस्टॉरंट मध्ये न करता गोर गरीबांना चादरी वाटप करूनच करायचं आणि प्रत्येक्षात त्यांनी रेल्वे स्थानकावरील बेवारस,अनाथ,भिक्षू अश्या लोकांना ब्लेंकेट (चादरी) वाटप करून एक अनोखा उपक्रम राबविला असल्याने शहरासह तालुक्यात कणसे कुटुंबीयांचे अभिनंदन,कौतुक केले जात आहे. वाढदिवस साजरा करतांना आपण आपल्या अवती भवती असलेल्या गोर गरीब लोकांचा विचार करूनच साजरा करावा सोबतच गोर गरीब लोकांना आपल्या माध्यमातून फुल नव्हे फुलाची पाकळी भेट म्हणून द्यावी कारण परमेश्वर तुमच्या कार्याची दखल नक्कीच घेत असतो म्हणून मुलाचा वाढदिवस साजरा करतांना आमच्या कुटुंबीयांनी घेतलेल्या निर्णयाला माझा नेहमीच पाठिंबा असतो तसेच गोर गरीबांना मदत करून मनाला आनंद भेटला असल्याची प्रतिक्रिया वडील भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे पाटील यांनी बोलतांना सांगितले.



समाजाचं काही देणं लागतो म्हणून कणसे कुटुंबीय दर वर्षी अनावश्यक खर्चाला फाटा देत लोकाभिमुख, गोर गरीबांना मदत करून वाढदिवस साजरे करतात वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला मापेगाव येथील स्नेकुंवर अनाथ आश्रम शाळेतील लहान लहान मुलांना चादरीचे वाटप करण्यात आले. जयेश शत्रुघ्न कणसे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गुरु गंगाभारती महाराज संस्थान दैठणा फाटा येथे अखंड हरिनाम सप्ताह निमित्त महापंगत होणार आहे म्हणून अन्नदाना करिता ११ हजार रुपयाची देणगी कणसे कुटुंबीयांच्या वतीने चि.जयेश शत्रुघ्न कणसे यांच्या हस्ते देण्यात आली. गुरू गंगा भारती महाराज संस्थान दैठना फाटा येथे मंदिर परिसर मध्ये जयशे च्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली यावेळी कमिटी अध्यक्ष, संस्थान सचिव, सदस्य,भाविक भक्त उपस्थित होते.

# शोभायात्रेने आज होणार राधाकृष्णजी महाराज यांच्या भागवत कथेला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

श्रीमद् भागवत कथा सेवा समिती व सनातन हिंदू समाज यांच्या संयुक्त विद्यमाने जालना शहरातील नवा मोंढा रोडवर ब्रजधामध्ये १८ ते २४ जानेवारीदरम्यान गोवत्स प. पू. राधाकृष्णजी महाराज यांच्या रसाळ वाणीतून आयोजित श्रीमद् भागवत कथा महोत्सवाची तयारी पूर्ण झाली असून, शनिवारी बडी सडकवरील श्रीराम मंदिर ते कथास्थळापर्यंत भव्य शोभायात्रेने कथा महोत्सवाला सुरुवात होणार आहे. घोडेस्वार, उंटस्वार, शाहिरी, लेझीम, ढोल व दांडिया पथक, विविध झांकी, कलशधारी महिला, विविध रथ हे शोभा यात्रेचे आकर्षण राहणार आहे.

सहा वर्षानंतर जालना येथे प. पू. राधाकृष्णजी महाराज यांची कथा होत असून, पंधरा हजार भाविक बसू शकतील, अशी बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. दरोज दुपारी १ ते ५ या वेळेत कथा होणार आहे. शनिवारी सकाळी ९ वाजता बडी सडकवरील श्रीराम मंदिरापासून शोभायात्रेला सुरुवात होणार आहे. बडीसडक, नरिमान रोड, बसस्टँड, राजुरी कॉर्नर, मुंडे चौक ते कथास्थळ ब्रजधाम असा शोभायात्रेचा मार्ग राहणार आहे. शोभायात्रा मार्गावर ठिकठिकाणी २५ स्वागत कमानी उभारण्यात येणार आहेत.



शोभायात्रेत २० रथांसहउंट व घोडेस्वार, १०१ कलशधारी महिला, गोवत्स प. पू. राधाकृष्णजी महाराज विराजमान असलेला रथ, प्रसिद्ध लक्ष्मी व बालाजी ब्रॉस बँड, उल्हासनगरचा बेंजो बँड, केरळचे बँड पथक, आत्याधुनिक चाऊ साऊंड, पंजाबी ढोल पथक, मंगलमय वाद्य, ततडम ताशा, दांडिया पथक, बाल वारकरी दिंडी, लक्ष्मीकांतनगर येथील प्रयाग विद्यालयाचे लेझीम पथक, दांडिया व ढोल पथक, भजनी मंडळ, माहेश्वरी किशोरी मंडळाचा रथावरील राधा कृष्णाचा देखावा, माहेश्वरी सहेली सखी ग्रुपचा रामदरबार, प्रसिद्ध शाहीर आप्पासाहेब उगले यांचे शाहिरी पथक, विप्र समाजाचा भगवान परशुराम देखावा, सिंधी समाजाचा गोपी–कृष्ण देखावा, सकल मराठा समाजाचा विठ्ठल रुक्माई देखावा, लंमाणी समाज झांकी, भागवत कथा ग्रंथ रथ, अकोल्याची बजरंगबली झांकी या शोभायात्रेत राहणार आहे. कथेच्या नियोजनासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले आहे. दररोज गोपूजन व तुलादान, पहाटे प. पू. राधाकृष्णजी महाराज यांच्या उपस्थितीत संभाजीनगर प्रभागातील श्री बालाजी मंदिर येथून विविध भागात प्रभात फेरी, १९ जानेवारीला रात्री ८ वाजता वृंदावन धामचे पूज्य इंद्रेशजी महाराज यांचा भजन महोत्सव, २२ जानेवारीला रात्री ८ वाजता निकुंज कामरा आणि आरुषी गंभीर यांची भजन संध्या होणार आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून कथास्थळी दररोज माहेश्वरी युवा संघटनच्यावतीने व जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबिर, जालना जनसेवा ग्रुप व विक्रम टी कंपनीतर्फे चहा तर सिंधी समाजातर्फे अल्पोपहार सेवा आदी सेवाभावी उपक्रम राबविले जाणार आहेत. युट्युबवरून भागवत कथेचे थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने शोभायात्रेत सहभागी होऊन भागवत कथा श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमद् भागवत कथा सेवा समिती व सनातन हिंदू समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

# गोवंश मांस विक्रीचे केंद्र बनले परतुर, मंठा!

## गोवंशानी भरलेले २ आयशर टेम्पो पकडून त्यांची कत्तली पासून केली सुटका; २० लाखाचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

परतूर पोलिस यांना दिनांक १६/०१/२०२५ रोजी रात्री मिळलेल्या गुप्त माहितीवरून गोवंशीय जनावरांना कत्तलसाठी जालना येथून परभणी येथे घेऊन जात असताना मांगीरबाबा चौक परतूर येथे दोन आयषर अडवून त्यांची झडती घेतली असता त्यामध्ये एकूण ३२ गोवंशीय बैल जनावरे मिळून आले आहेत, त्यांची विचारपूस केली असता परभणी येथे कत्तल खाण्यात घेऊन जात असल्याचे समजले, एकूण ३२ जनावरे किंमत ४ लाख ८५ हजार रुपये आणि आयशर टेम्पो किंमत १६ लाख रुपये, असा एकूण २० लाख ८५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, सर्व जनावरे जप्त करून पारडगाव येथील गोशाळेत जमा केले आहे. यामध्ये आरोपी नामे १)कुनजऱ्या जुआनसिंग बोर्डे रा. बळखाड ता. शेंदवा जि. बडवणी मध्य प्रदेश, २) मुस्ताक सुपडू शेख रा. सावदा ता. जि. जळगाव, ३)नदीम अख्तर हमीद अन्सारी रा. मालेगाव जि नाशिक, ४) अस्लम फकिरा शेख रा. पाचोरा जि. जळगांव यांच्यावर पोस्टे परतूर येथे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल केले करून आयशर टेम्पो जप्त करून कारवाई केली आहे. परतुर तालुक्यातील वाटुर फाटा येथील मुख्य चौकालगत तर मंठा येथील खाटीक गल्ली येथे मोठ्या गोवंश मांस विक्री मोठ्या प्रमाणात होते, याकडे मात्र पोलिसांचे दुर्लक्ष आहे. सदरची कारवाई ही मा. श्री. अजय कुमार बंसल, साहेब, पोलिस अधीक्षक जालना, मा. श्री. आयुष नोपाणी, साहेब, अप्पर पोलिस अधीक्षक जालना, मा. श्री. दादहरी चौरे, साहेब, उप विभागीय पोलिस अधिकारी, परतूर यांच्या मार्गदर्शनाखाली एम.टी.सुरवसे, पोलिस निरीक्षक, पोलिस स्टेशन परतूर. भिमराव मुंढे, पो उप निरिक्षक, पोकॉ / दीपक आढे, पोकॉ/ अचुत चव्हाण, पोकॉ/ ज्ञानेशोर वाघ, पोकॉ/देवा जाधव, पोकॉ/ राम पारवे, चालक/ पोकॉ स्वप्नील फंड यांनी केली आहे.





# सकल मराठा समाजाचा आक्रोश मोर्चा स्थगित

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १७ जानेवारी**

उद्या दि. १८ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आलेला सकल मराठा समाजाचा नांदेड येथील आक्रोश मोर्चा स्थगित करण्यात आला असल्याची माहिती मराठा आंदोलक श्याम पाटील वडजे यांनी पत्रकार परिषदेत दिली. सकल मराठा समाज तर्फे मस्साजोग चे सरपंच कै.संतोष देशमुख यांच्या हत्येसंदर्भात १८ जानेवारी रोजी भव्य आक्रोश मोर्चा काढला जाणार होता असे सकल मराठा समाजच्या ११जानेवारीच्या बैठकीत ठरले होते. त्याअनुषंगाने शासनाने आरोपी विरोधात मकोका लावून आरोपींना पोलीस कोठडीत पाठविले त्यामुळे नियोजित असलेला नांदेड येथील आक्रोश मोर्चा तुर्त स्थगित करण्यात आल्याची माहिती मराठा सेवक श्याम पाटील वडजे यांनी दिली. जनमानसात दहशत निर्माण करणा-या मस्साजोग घटनेने माणुसकीला काळीमा फासला आहे. नांदेडसाठी बीड जिल्ह्यातील मंत्री हे शासनाने पालकमंत्री म्हणून नेमू नयेत.२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त बीडचे मंत्री नियुक्त करू नये.असेही श्याम पाटील वडजे यावेळी म्हणाले. या पत्रकार परिषदेला दशरथ कपाटे, गोविंद शिर्शीकर, सुनील पाटील कदम, नाना बेटसांगवीकर, भास्करराव हंबर्डे, सुभाष कोल्हे, दत्ता खराटे, सुधीर देशमुख , नवनाथ जोगदंड, राज सरकार, दत्ता इंगळे, डॉ बालाजी पेनूरकर व समस्त समाज बांधव उपस्थित होते.

# मराठवाड्यातील रेल्वेच्या विविध प्रश्नाबाबत खा. गोपछडे यांनी वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १७ जानेवारी**

मराठवाड्यातील रेल्वेचे विविध प्रश्न घेऊन खा. डॉ .अजित गोपछडे यांनी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रवणीत सिंह बिटू यांची आज भेट घेतली. या भेटीत त्यांनी रेल्वेचे अनेक प्रश्न निदर्शनास आणून दिले . शीख बांधवांची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सचखंड हुजूर साहेब नांदेड येथील सर्व रेल्वे प्रश्न मार्गी लावू असा विश्वास केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंह बिट्टू यांनी खा. डॉ. अजित गोपछडे यांना दिला आहे .

नांदेड विभागातील रेल्वेचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत शिवाय अनेक प्रश्नांकडे लक्ष देण्यात आले नसल्याने रेल्वे प्रवाशांच्या समस्यांमध्ये मोठी वाढ झालेली होती. एवढेच नाही तर काही बंद पडलेल्या रेल्वे पुन्हा सुरू करण्यात आल्या नाहीत . यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या रेल्वे प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत. या सर्व बाबी लक्षात घेता खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री बिट्टू यांची दिल्लीत भेट घेतली. धर्माबाद रेल्वे स्टेशनला परमपूज्य डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचे नाव देण्यात यावे . डॉ. हेडगेवार यांचे गाव धर्माबाद पासून अवघ्या सात किलोमीटर अंतरावर असल्याने परमपूज्य डॉ. केशवराव हेडगेवार यांचा सन्मान व्हावा यासाठी धर्माबादच्या रेल्वे



स्थानकाला प.पू. डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी यांनी यावेळी केली. याचवेळी नांदेड ते प्रयागराज महाकुंभ स्पेशल एक्सप्रेस रेल्वेच्या फेऱ्या वाढवाव्यात आणि द्विसाप्ताहिक एक्सप्रेस रेल्वे सुरू करावी अशी मागणी ही त्यांनी यावेळी केली. याचवेळी नांदेड येथून नवीन रेल्वे सुरू करण्यासाठी त्यांनी रेल्वे केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडे विनंती केली. यात नांदेड ते तिरुपती , नांदेड - पुणे-कोल्हापूर , नांदेड- नागपूर , नांदेड - भूज आणि मुदखेड - रोटेगाव या रेल्वे गाड्या सुरू कराव्यात अशी मागणी ही त्यांनी केली . कोरोना महामारीच्या काळात गरिबांचा रथ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुदखेड - रोटेगाव ही रेल्वे बंद करण्यात आली होती परंतु आता कोरोना काळ संपला असल्याने या मार्गावरील ही रेल्वे पूर्ववत सुरू करावी आणि सामान्य रेल्वे प्रवाशांना दिलासा द्यावा . उमरी येथे नगरसोल एक्स्प्रेसला थांबा देण्यात यावा . गोरठा अंडर ब्रिजचे काम तातडीने पूर्ण करावे , नांदेड - बीदर रेल्वे मार्गाचे प्रत्यक्ष काम सुरू करावे , बोधन - मुखेड - लातूर , नांदेड - लोहा - लातूर या नव्या रेल्वे मार्गाची निर्मिती करावी अशी मागणी त्यांनी केली.

**दौंड - निजामबाद डेमो एक्सप्रेस पूर्णा परभणी पर्यंत वाढवा**

दौंड - निजामबाद डेमो एक्सप्रेस ही नांदेड येथून सकाळी सहा वाजता सुटते परंतु सकाळी सहा वाजता सुटणाऱ्या या रेल्वेला प्रवासी म्हणावे तेवढ्या प्रमाणात मिळत नाहीत . शिवाय मुदखेड येथे या रेल्वेला जवळजवळ दीड तासाचा लूज टाईम ठेवण्यात आला आहे . या दोन्ही गोष्टी लक्षात घेता रेल्वे प्रवाशांना मोठी गैरसोय होत असल्याने नांदेड येथून सकाळी सात किंवा साडेसात वाजता ही रेल्वे सोडण्यात यावी . मुदखेड येथील लूज टाईम भरून काढण्यासाठी ही गाडी पूर्णा आणि परभणी पर्यंत सोडण्यात यावी. या ठिकाणी रेल्वेची स्वच्छता करण्यात यावी. रेल्वेत मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध करण्यात यावे अशी मागणी ही खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडे केली आहे.

**वंदे भारत नांदेड पर्यंत सोडा**

मुंबई - जालना वंदे भारत रेल्वेला डब्बे वाढवून ही रेल्वे नांदेड पर्यंत सोडण्यात यावी अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री बिट्टू यांच्याकडे केली. जालना पर्यंत येणारी वंदे भारत नांदेड पर्यंत सोडल्यास नांदेडच्या रेल्वे प्रवाशांना मुंबईचा प्रवास सहज करता येईल . शिवाय जलद गतीचा प्रवास उपलब्ध झाल्याने व्यापाऱ्यांची , अधिकारी - कर्मचाऱ्यांची आणि विद्यार्थ्यांची कामे नियोजित वेळेत पूर्ण करता येतील अशी माहिती ही खा.डॉ. अजित यांनी केंद्रीय रेल्वेमंत्र्यांना यावेळी दिली.

## संक्षिप्त वृत्त

### जि. प. कें. प्रा कन्या शाळा हिमायतनगर येथे निपुण भारत अंतर्गत माता पालक मेळावा

**हिमायतनगर**-हिमायतनगर येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक कन्या शाळा येथे निपुण भारत अंतर्गत माता पालक मेळाव्याचे आयोजन केले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन शिक्षण समितीच्या सदस्या हे प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्री मेकाले , अरुण पाटील पांपटवार , गणेशराव पाळजकर , किरांजी माने, कार्यक्रमाचे प्रस्ताविक शाळेतील मुख्याध्यापक श्री कदम सर यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती हेमा कन्नावार यांनी केले.या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात महिलांनी आपली उपस्थिती दर्शवली होती.या आठवड्यात मकर संक्रांत चालू असल्यामुळे हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाबरोबर वाण वाटपाचा सुद्धा आणि त्यात महिलांचे विविध खेळ सुद्धा घेण्यात आले. विद्यार्थ्यांच्या नात्याबरोबरच माता पालकांचेही नाते सुद्धा या शाळेबरोबर असावे तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षकाबरोबर पालकांचाही सहभाग किती महत्त्वाचा असतो.हे या कार्यक्रमाद्वारे पटवून देण्यात आले. यावेळी शिक्षक शिक्षक उत्तर कर्मचारी व पालक वर्ग व महिलाचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता.



**नांदेड-विश्वनाथ नगर येथिल पंचशील बुद्ध विहारात राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात गीत पुजरवाड, प्रांजल गुरूपवार, श्रेया कदम या चिमुकल्या माँ जिजाऊच्या वेशभुषेत होत्या. यावेळी मुरलीधर पाईकराव, भिमशाहीर अशोक चौरे, बबन पाईकराव व महिला मंडळ उपस्थित होते.**

# गरिबांसाठी भोजनदान व चादर वाटप

**वाघमारे दाम्पत्याचा सेवाभावी उपक्रम**

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १७ जानेवारी**

शहरातील डॉ. राम वाघमारे व सुवर्णा वाघमारे या दाम्पत्याने समाजसेवेचा वसा पुढे नेत गेल्या अनेक पासून आपल्या वडिलांच्या स्मृतिदिनानिमित्त गरिबांसाठी भोजनदान व चादर वाटपाचा उपक्रम राबवत आहेत. थंडीच्या कठीण काळात गरजूंना उबदार चादरींचा आधार देत, वाघमारे दाम्पत्याने त्यांच्यासोबत प्रेम, माणुसकी व सहकार्याची भावना व्यक्त केली. त्यांनी गरिबांशी संवाद साधत त्यांना आर्थिक मदतीसोबत मानसिक आधारही दिला. डॉ. राम वाघमारे हे साहित्यिक असून महात्मा फुले शाळेत सहशिक्षक आहेत. आज घेण्यात आलेल्या या उपक्रमात त्यांचे चिरंजीव सार्थक वाघमारे, प्रा. डॉ. शुद्धोधन गायकवाड व मिलिंद व्यवहारे यांची उपस्थिती होती. शहरातील विविध भागात जाऊन त्यांनी गोरगरिबांना अन्नदान व चादर चे वाटप केले.

# जादा दराने खत विक्री करणाऱ्या दुकानदारांवर कार्यवाही करा

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १७ जानेवारी**

मुदखेड तालुका हा ओलीताचा तालुका असुन सदरील भागात मोठया प्रमाणात खताची आवश्यकता असुन सद्या गहु, ऊस, भोईमुग करीता मोठया प्रमाणात खताची आवश्यकता आहे. मार्केट मध्ये खताची साठवन कमी असल्याचे शेतकऱ्यांना सांगीतले जात आहे. आणि दुकानदाराकडून खत ज्यादा दराने विक्री करण्यात येत आहे. कृत्रिम तुटवडा त्वरीत थांबवुन शेतक-यांना त्वरीत दिलासा दयावा.



युवासेना तालुकाप्रमुख शिवाजी पा गाढे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे. मुदखेड तालुक्यातील कृषी केंद्रावर किती साठवनुक आहे याची माहिती मागितली असता कृषी तालुका अधिकारी यांनी गाडे यांना कोणताच अहवाल दिला नाही. तालुक्यातील कृषी सेवा केंद्रात किती खताचा साठा आहे. याची त्वरीत माहिती घ्यावी तसेच ज्यादा दराने विक्री करणा-या कृषी सेवा चालकावर योग्य ती कार्यवाही करावी असे निवेदनात नमूद केले आहे. यावेळी युवासेना तालुका प्रमुख शिवाजी पाटील गाढे, उपतालुकाप्रमुख संजय पाटील, केशव पाटील शिंदे, अनिल पाटील कुरे, शाम पाटील शिंदे, ज्ञानेश्वर पाटील माळकोठेर, यासह आदी युवासेना कार्यकर्ते उपस्थित होते.

# बौद्ध समाजाच्या मागण्यासाठी नगरपालिकेच्या विरोधात उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. १७ जानेवारी**

हैदराबाद संस्थांच्या वतीने तत्कालीन हरिजन बौद्ध समाजाच्या उन्नतीसाठी १२ एकर २५ गुंठे जमीन नावे केली होती त्या जमिनीवर तुगलकी नगरपरिषद प्रशासनाने व्यापारी संकुल तथा शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारण्याचे काम सुरू केले आहे त्या विरोधात सिद्धार्थ नगर येथील सकल समाजातर्फे दिनांक १५ जानेवारी २०२५ पासून उपजिल्हाधिकार्यालय देगलूर येथे त्या विरोधात सिद्धार्थनगर येथील सकल समाजातर्फे बेमुदत साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे दरम्यान या आधीही सर्व समाज बांधवांच्या वतीने नगरपालिका प्रशासनास आक्षेपाच निवेदन सादर करण्यात आले होते तरीही प्रशासनाच्या वतीने या नियोजित जागी रात्रंदिवस काम चालू ठेवून बौद्ध समाजाची हंटाळणी केली आहे शहरातील ही जमीन गेल्या अनेक वर्षापासून पडीत होती त्या ठिकाणी हळूहळू अतिक्रमणे सुरू झालेली आहेत त्यामुळे जमिनीवर नगरपालिका प्रशासनाने ठराव समाजाची जागा गीळकृत करीत आहे व्यापारी संकुल बांधण्याचा निर्णय घेतला आहे.

# टॉवरवरील घड्याळासह शहरातील विविध मागण्यांसाठी किशोरकुमार वागदरीकर यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १७ जानेवारी**

नांदेड शहराचे वैभव असलेल्या जुना मोंढा टॉवरची दुरवस्था झाली असून या परिसराचे सुशोभिकरण व ऐतिहासिक टॉवरवरील बंद असलेली घड्याळ पुर्ववत सुरु करण्यासह शहरातील विविध भागातील रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करण्याची मागणी पत्रकार किशोर वागदरीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.





शहरातील जुना मोंढा टॉवर म्हणजे शहराचे वैभव आहे. या टॉवरला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. कधीकाळी या टॉवर असलेल्या घड्याळाचे काटे नित्यनियमाने सुरु होते. परंतु कालांतराने या टॉवरची दुरवस्था झाली असून घड्याळही बंद पडले आहे. वारंवार विनंती करूनही या बाबीकडे स्थानिक महानगरपालिका प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. या टॉवरचे सुशोभिकरण करावे आणि बंद घडी दुरुस्त करून शहराचे गत वैभव पुन्हा प्राप्त करून द्यावे, अशी मागणी किशोरकुमार वागदरीकर यांनी केली आहे. याशिवाय शहरातील रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली असून जागोजागी, गल्लोगल्ली घड्डेमय रस्ते झाल्यामुळे वयोवृद्ध तसेच सर्वसामान्य नागरिकांना चालणे कठीण बनले आहे. रस्त्यांची दुरुस्ती करून नागरिकांचा होणारा त्रास्त थांबवावा, शहरातील विविध महापुरुषांचे पुतळे असून त्या परिसरात स्वच्छतेचा अभाव आहे, त्याकडेही लक्ष द्यावे. शहरात अनेक ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असले तरी ते बंद अवस्थेत आहेत, श्री गुरुगोविंद सिंघजी जयंतीनिमित्त ६ जानेवारी रोजी शासकीय सुट्टी जाहीर करावी, तसेच शहरात दररोज होणारी वाहतुकीची कोंडी दुर करण्यासाठी रस्त्यांचे रुंदीकरण करणे गरजेचे असल्याचीही मागणी वागदरीकर यांनी या निवेदनात केली आहे.

# ग्राम सडक योजनेचे काम निकृष्ट; चौकशीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. १७ जानेवारी**

राज्य महामार्ग -६१ ते नागापूर रस्ता दूरूस्तीसाठी ग्राम सडक योजनेतून काम सूरु करण्यात आले असून सदरिल काम संथगतीने व निकृष्ट दर्जाचे होत असल्याने याचा नाहक त्रास नागापूर वासीयांना होत असून सदर कामाची चौकशी करुन दोषी कंत्राटदारावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी नागापूर ग्रा.पं.सदस्य मारोती बेरदेवाड सह गावकर्‍यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद नांदेड यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले कि,गणेश इंटरप्रायजेस कडून सूरु असलेले राज्य महामार्ग ६१ ते नागापूर रस्त्याचे काम संथगतीने चालू आहे ३० जानेवारी २०२४ पासून सूरु झालेले काम २९ जानेवारी २०२५ पर्यंत कामाचा कालावधी ठरवून देण्यात आल्यामूळे अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असून गावातील शाळकरी मूला मूलींना भोकरला शिक्षणासाठी घेवून जाण्यासाठी महामंडळाची एस.टी. नागापूर येथे येत असताना सि.सि. रस्त्याच्या खाली उतरल्याची घटना घडली असून सदर रस्ता हा गावा लगत जात असल्याने गावकर्‍यांना त्रास होत आहे. सदर कामासंदर्भात कंत्राटदाराकडे तक्रार केली असता उलट कंत्राटदाराने अरेरावीची भाषा वापरत तूमच्याने काय करायचे करा अशी धमकी दिल्याचे निवेदनात नमूद आहे त्यामूळे सदरील निकृष्ट कामाची चौकशी आठ दिवसात करुन होत असलेले काम हे सदर कंत्राटदाराकडून काढून घेण्यात यावे व त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी अन्यथा दि.२६ जानेवारी पासून नागापूर रहिवाशी च्या वातीने संबधित कार्यालयासमोर जन आंदोलन करण्याचा ईशारा निवेदनाद्वारे देण्यात आला . निवेदनावर अविनाश, दत्ता बेरदेवाड, गजानन पांडूरंग , उल्लेवाड मारोती, सटवाजी बेरदेवाड, राजेश्वर मारोती शानमवाड, गणेश दत्ता बेरदेवाड, किशन बालाजी उल्लेवाड आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शेलगांवमधील जल जीवन मिशनच्या कामाचा बट्ट्याबोळ

**गुत्तेदाराच्या हालगर्जी पणामुळे काही वसाहातीत कामाचा ठणठणाट**

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. १७ जानेवारी**

तालूक्यातील शेलगांव (धा.) येथे जलजीवन मिशनच्या कामाचा बट्ट्याबोळ झाला आहे.

गुत्तेदाराच्या हालगर्जी पणामुळे काही वसाहातीत पाणी पुरवठा कामाचा ढणढणाट दिसुन येत आहे. कामाच्या संदर्भात ग्रामपंचायतीने अनेकवेळा अपुर्ण कामाबद्दल सुचना देऊन सुध्दा गुत्तेदार गावातील कामाकडे दुर्लक्ष करतो आणि गावकऱ्यांला जलजीवन चे काम आपल्या गावातील नव्वद टक्के झाले म्हणुन तोऱ्यात चर्चा करत फिरत आसतो.

तालुक्यात अनेक गावांत ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे काम चालू आहेत.ठरवुन दिलेल्या



मुदतीत काम केले जात नाही, अनेक कामे दर्जाहीन केली जातात. आ. प्रताप चिखलीकर व आ. बोंढारकर यांची के.के.मंगल कार्यालयातील आढावा बैठकीत अनेकानी तक्रारींचा पाढाच वाचला. अंदाजपत्रकाचा ताळमेळ जळतच नाही असे कामे केली जात. विविध वसाहतीतील मुख्य ठिकाणी नळ कनेक्शन दिलं जात नाही, अंगणवाडी, शाळा, समाजमंदिर, बौद्ध वस्ती, मुस्लिम वसाहातीच्या ठिकाणी कनेक्शन दिले गेले नाहीत. गावकऱ्याच्या सर्वेनुसार सदरील कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे जनतेच्या चर्चे तून ऐकायला मिळत आहे. संबंधित गुत्तेदार व अभियंत्यावर कार्यवाही करण्या संदर्भात अनेक वेळा सरपंच व ग्रामस्थांनी कार्यवाहीची मागणी केली आहे.

शेलगांव येथील जलजीवन मिशनच्या कामाला भ्रष्टाचाराची वाळवी लागली असून कामाचा बोजवारा उडाला आहे. या बाबीची गांभीर्याने दखल घ्यावी अशी मागणी केली आहे.ग्रामिण पाणी पुरवठा प्रकल्प विभाग लोहा व मुख्यकार्यकारी अधिकारी, यांना संबंधित गुत्तेदाराच्या चौकशी संदर्भात अनेक वेळा रितसिर निवेदने देऊन मागणी केली असल्याचे निवेदनात नमुद केले आहे.या तक्रारींकडे प्रशासनाला जाग येत नसल्याचेही बोलल्या जात आहे. संबंधित गुत्तेदाराला काळ्या यादित टाकून उच्चस्तरीय चौकशी करून दोषीवर योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी जोर धरत आहे.

# प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे शिबीर २१ जानेवारीला

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १७ जानेवारी**

दि. १७ जानेवारी रोजी हजरत हाजी सय्याह सरवरे मगदुम बडी दर्गाह कंधार ऊर्स निमित्त नांदेड जिल्ह्यात स्थानिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. याअनुषंगाने प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे दैनंदिन सर्व कामकाज बंद राहणार असल्याने माहूर येथे आयोजित शिकाऊ व पक्के अनुज्ञप्तीचे मासिक शिबिर मंगळवार २१ जानेवारी रोजी घेण्यात येणार आहे.

शुक्रवार १७ जानेवारी रोजी शिकाऊ व पक्के अनुज्ञप्तीकरीता अपॉईमेंट घेतलेल्या अर्जदारांनी २१ जानेवारी रोजी माहूर येथील शासकीय विश्रामगृह येथे उपस्थित रहावे, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

# कात टाकलेल्या श्री रेणुकादेवी संस्थानच्या कर्मचाऱ्यांमध्ये पुन्हा उत्साह!

**● १८ फेब्रुवारी रोजी स्थानिक कमिटीचे माहूरमध्ये पहिले- वहिले अधिवेशन**

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. १७ जानेवारी**

राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मूळ पीठ असलेल्या प्रसिद्ध तीर्थक्षेत्र माहूरगडला माहेरघर व देवभूमी म्हणून ओळखले जाते. माहूर येथील विविध मंदिर संस्थानांपैकी श्री रेणुकादेवी मंदिर संस्थान हे सर्वात मोठे संस्थान म्हणून गणले जाते.येथे मातेच्या दर्शनासाठी दररोज हजारोंच्या व वार्षिक लाखोंच्या संख्येत येणाऱ्या भाविकांच्या सोयीसुविधेसाठी संस्थानच्यावतीने मोठ्या प्रमाणात कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहेत.परंतु, विविध मागणीसंदर्भात कर्मचाऱ्यांप्रति संस्थानचे विश्वस्त हे अत्यंत उदासीन असल्याची भावना येथील कर्मचाऱ्यांमध्ये दिवसेंदिवस वाढत असून,या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी श्री रेणुकादेवी संस्थान माहूरगड येथील कर्मचाऱ्यांनी पुढील महिन्यात १८ फेब्रुवारी रोजी सीटू संलग्न मजदूर युनियनच्या स्थानिक शाखेचे पहिले- वहिले अधिवेशन घेण्याचा निर्णय घेतला आहे.

दि. १५ जानेवारी रोजी माहूर मध्ये घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या बैठकीतील हा निर्णय आहे. या बैठकीस सीटूच्या राज्य सचिव कॉ. उज्वला पडलवार, किसान सभेचे नेते कॉ. किशोर पवार, जमसंच्या जिल्हा अध्यक्षा कॉ.लता गायकवाड आणि सीटूचे जनरल सेक्रेटरी तथा मजदूर युनियनचे अध्यक्ष कॉ. गंगाधर गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.तर या बैठकीस एकूण ३० कर्मचारी उपस्थित होते. साधारणतः सन २०१९ मध्ये सीटूचे जिल्हा जनरल सेक्रेटरी तथा मजदूर युनियनचे अध्यक्ष कॉ. गंगाधर गायकवाड यांच्या नेतृत्वात माहूर गडावरील ५६ कर्मचाऱ्यांनी सीटू कामगार संघटनेचे सभासदत्व स्वीकारत युनियनची स्थापना केली होती.स्थानिक युनिटचे अध्यक्ष कॉ.



श्रावण जाधव आणि सचिव कॉ. अरुण घोडेकर यांनी प्रामाणिकपणे आजपर्यंत काम पाहिले आहे.परंतु संस्थानचे अध्यक्ष,सचिव, उपाध्यक्ष व कोष्याध्यक्ष यांच्याकडून पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नसल्याने व दिलेली आश्वासने पूर्ण केली नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये संस्थान प्रति अविश्वास निर्माण झाला आहे.

तत्कालीन संस्थांनचे सचिव श्री अभिनव गोयल(भा.प्र.से.) यांनी लेखी आश्वासन दिल्यामुळे पहिले उपोषण मोठ्या आशावादाने थांबविण्यात आले होते. तर, २०२२ मध्ये दुसरे साखळी उपोषण तब्बल ८४ दिवस गडाच्या पायथ्याशी पहिल्या पायरीजवळ केले परंतु विश्वस्तानी रडीचा डाव खेळत कुणालाही उपोषणाची दखल घेऊ दिली नाही. सर्वच हतबल झाल्या सारखे वागले आणि 'संस्थान जिंकले व कामगार हारले' असाच काहीसा मागील इतिहास आहे. सीटू कामगार संघटनेच्या झेंड्याखाली देशातील सर्वात मोठे देवस्थान तिरुपती बालाजी पासून ते नाशिकच्या सप्तश्रृंगी मातेच्या संस्थानापर्यंत युनियन अस्तित्वात आहेत.तेथील कर्मचाऱ्यांना किमान २० हजार रुपये ते ६० हजार रुपयापर्यंत दरमहा पगार आहे.

सध्यस्थीतीत येथे ६७ कर्मचारी कार्यरत असून, नव्या जोमाने संघटना सक्रिय करुन एकीच्या बळाने पुन्हा संघर्ष करण्याचा निर्धार करून फेब्रुवारीच्या १८ तारखेला पहिले वहिले शाखा अधिवेशन माहूर शहरात घेण्यात येणार असून, याकामी विश्वस्तांनी काही आडकाठी आणलीच तर भगवान परशुरामाच्या आश्रयाने तेथेच गडावर अधिवेशन पार पाडण्याचा पर्याय देखील खुला ठेवण्यित आला आहे.

उदासीन असलेल्या विश्वस्तांना सुबद्धी सुचो आणि इतर देवस्थानातील कर्मचाऱ्यांप्रमाणे माहूर गडावरील कर्मचाऱ्यांना लेखी आश्वासना प्रमाणे सेवेत समावून घेऊन किमान वेतन मिळावे यासाठी या अधिवेशनात ठराव पारित करण्यात येणार आहेत. सदरील अधिवेशनाची जय्यत तयारी सुरु करण्यात आली असून, हे अधिवेशन खुपच महत्वपूर्ण ठरणारे आहे.कारण, या अधिवेशनास इतर संस्थांनातील युनियन चालवीणारे पुढारी मार्गदर्शन करण्यासाठी येणार आहेत.अशी माहिती सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (सीटू)कामगार संघटनेचे जिल्हा जनरल सेक्रेटरी तथा मजदूर युनियनचे अध्यक्ष कॉ. गंगाधर गायकवाड यांनी कळविली आहे.